९६६३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १२०७



# ग्रामीण नृत्यगीतें

REFBK-0013474
REFBK-0013474

संपादक : कृष्णदेव मुळगुंद

१३६८०४

# ग्रामीण नृत्यगीतें

REFBK-0013474
REFBK-0013474

संपादक :

कृष्णदेव मुळगुंद

मूल्य दोन रुपये

प्रकाशक :
ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.
ठोकळ प्रकाशन
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता
पुणें २

पाहिली आवृत्ति : १९६३

एकमेव विक्रेते :
श्री लेखन वाचन भांडार
लक्ष्मी रस्ता, पुणें २

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव–पार्वती
४६१/४ सदाशिव पेठ
पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३६०.६०...... वि: ...काव्य......
क्रमांक ....१६०.८...... नों: दि: ...२/३/८३

## पाऊल टाकण्यापूर्वी

प्रजासत्ताक दिनादिवशीं भारताच्या राजधानींत लोकनृत्यकारांचे ताफेच्या ताफे पाहिल्यावर, खरोखरीच डोळे दिपून जातात. निरनिराळ्या जमातींनीं परंपरेनें जतन करून ठेवलेली ती एक कला आहे. त्यांचीं तीं विविध वाद्यें, ते पोषाख, नृत्यपद्धती आणि आपआपल्या जीवनाचें दर्शन घडविणारीं विविध भाषेंतील गीतें मोठ्या आवडीनें, अभिमानानें जोपासलीं गेलेलीं दिसून येतात. वैचित्र्यानें नटलेली ही अशिक्षितांची कला आम्हां सुशिक्षितांनींही कौतुकानें पहावी, किंबहुना त्यांच्यासारखें आपणही नृत्य करावें, इतकी ती लोकप्रिय बनली आहे.

युवकमहोत्सव, क्रीडामहोत्सव आणि आंतरशालेय चढाओढी, अशा निमित्तांनीं शिक्षणधिकाऱ्यांनीं ह्या कलेला चालना दिल्यानें एका दिव्य कलेचें दर्शन आम्हां सुशिक्षितांना झालें आहे. इतर गाण्यांबरोबर लोकनृत्याचीं गाणींही

ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकूं येऊं लागलीं आहेत. इतर कोणत्याही कार्यक्रमाला होणार नाहीं, इतकी अलोट गर्दी लोकनृत्याच्या कार्यक्रमाला होते. शालेय चढाओढीच्या दिवशीं तर जागेच्या अभावीं विन्मुख होऊन, हिरमुसल्या चेहऱ्यानें परतणाऱ्या विद्यार्थीनींकडे पाहिलें म्हणजे – नृत्य होण्यापूर्वी उन्हांत दोन दोन – तीन तीन तास, जागेसाठीं आधीं येऊन बसणाऱ्या त्या विद्यार्थिनी आणि इतर प्रेक्षक वर्ग पाहिला म्हणजे, त्या कलेबद्दलची त्यांची अत्यंतिक तळमळ दिसून येते. जितका आनंद नृत्य करणाऱ्यांना, तितकाच पहाणाऱ्यांनाही घेतां येतो, हें सहज दिसून येतें !

लोकनृत्यांत सर्वांगीण शारीरिक हालचालींमुळें होणारा व्यायाम, कमींत कमी खर्चात प्रेक्षक व नृत्य करणारे यांस निर्भेळ आनंदाची होणारी प्राप्ती, नृत्यद्वारें कांहीं सांस्कृतिक व शैक्षणिक मूल्यांची मिळणारी मेजवानी व नृत्यांतील प्रसंगांना धरून असणारी पोषाखाची सजावट इत्यादि हेतुंचा व उद्दिष्टांचा समावेश समजूतदारपणें आजपर्यंत शालेय लोकनृत्यांच्या चढाओढींत दिसून आला आहे. हीच दृष्टि ठेवून त्यांत सुधारणा जास्त प्रमाणांत होत गेल्यास, ह्या लोकशाही युगांत लोकांच्या अभिरूचीस ती कला जास्त प्रमाणांत मात्र होईल व लोकनृत्याचा दर्जा अधिक उंचावेल.

कोणत्याही आनंदाच्या प्रसंगीं स्त्री, पुरुष, मुलें-मुली या सर्वांनीं एकत्र येऊन कौटुंबिक व सात्त्विक भावना हलवून सोडणाऱ्या अशा कर्णमधुर काव्य-पंक्तीवर तालाच्या गतीनुसार तालबद्ध व लयबद्ध पदविन्यास करून त्यांत दंग होणें व आनंदांत बेहोष होणें, अशी साधीसुधी लोकनृत्याची व्याख्या योग्य वाटते.

पुणें येथें दरवर्षी होणाऱ्या लोकनृत्यांच्या आंतरशालेय चढाओढीसाठीं भाग घेतलेल्या विविध शाळांनीं तयार केलेल्या गीतांपैकीं कांहीं निवडक गीतांचा हा संग्रह आहे. हीं नृत्यगीतें वरील परिच्छेदांत दिलेल्या व्याख्येच्या कक्षेंत पुष्कळशा अंशानें बसतील असें वाटतें.

काव्यांतून ग्रामीण जीवनाचें दर्शन घडविणारे श्री. ग. ल. ठोकळ यांचीं 'सुगी', 'गारोडी', 'वाघ्यामुरळी' इ. नृत्यगीतें प्रत्यक्ष महाराष्ट्राची संस्कृति दर्शवितात.

वंजारी बायकांच्या डोक्यावर उंच दिसणारी काठी हें त्यांचें सौभाग्य लेणें

आहे. वारल्यांच्या राजास एका निष्पाप व भोळ्या हरणीच्या तोंडून वदविलेलें तत्त्वज्ञान कोणाही सात्विक माणसाचें हृदय हलवून सोडते, तर धनगर जमातीचें नृत्यगीत भाषेचें व सूक्ष्म विनोदाचें प्रतीक वाटते. असल्या सूक्ष्म निरीक्षणानें गुंफलेलीं श्री. गो. नी. दांडेकर यांचीं काव्यें आहेत.

श्रीमती यशवंतीबाई गुप्ते यांचा पेशा शिक्षिकेचा, परंतु प्रासंगिक विचाराच्या सजावटीनें सजलेलें 'रासनचं भै आमा नाय वो' हें गाणें व 'हेल घालाया जाऊं गो चला' हें साध्यासुध्या कौटुंबिक व आनंदाच्या प्रसंगावर असलेलें नृत्यगीत सुप्त आनंदाची निर्मिती केल्याशिवाय राहात नाहीं.

ह्या संग्रहांतील माझ्या गीतांबद्दल मी कांहीं सांगणें बरें नव्हे! तें वाचकांनीं ठरवावें. नृत्याचें गीत तयार करतांना व स्वतः मी तें बसवितांना काय केलें एवढें मी आपल्यापुढें मांडतों.

सुरवातीला कांहीं काल लोकनृत्यकारांच्या, त्या त्या जमातीचें अनुकरण करीत, त्यांचें जीवन मी प्रेक्षकांसमोर उभें केलें. कालांतरानें मात्र, त्यांच्याच जीवनांतील प्रसंग–एवढेंच नव्हें तर त्यांना मार्गदर्शक होतील अशा कांहीं घटना नृत्यांतून दाखवितांना पदन्यासांतील विविधता, मांडणींतील वैचित्र्य दाखवण्याचा मी प्रयत्न केला. नृत्याला योग्य अशा घटना घेऊन त्यांवर गीतांची रचना मी केली! कांहीं गोष्टी एरवीं आपण आपल्या सणांतून पहात आलों आहोंत, पण नृत्याच्या दृष्टीनें त्यांकडे कोणाचें लक्ष गेलें नव्हतें! उदाहरणार्थ, ह्या संग्रहांतील 'नवरात्र' ह्या गीताकडे पाहिलें तर ही गोष्ट ध्यानांत येईल. नृत्याला लागणारी लय, कांहीं अंगविक्षेप त्या प्रसंगांत आहेत, असें दिसून आल्याबरोबर मी गीताची रचना केली. तसेंच होळीच्या दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं, हातांत तलवारी घेऊन नाचणारे वीर मी पाहिले आणि त्यावर गीताची रचना केली, सुंदर नृत्याची सजावट केली.

अनुकरणांतून स्वतंत्र कल्पनेवर नृत्य करून दाखविण्याचा प्रयत्न मी केला असला तरी–त्याचबरोबर हेंही सांगणें भाग आहे कीं, नृत्यांतील सहजता आणि समरस होण्याची प्रवृत्ती मात्र आम्हां शहरवासीयांत निर्माण होऊं शकत नाहीं. त्याला कारण–आम्ही नृत्य करतांना–नृत्याचें गीत म्हणतांना–वाद्यें वाजवितांना–कुणी तरी प्रेक्षक आमचें नृत्य पहात आहेत, ही भावना आमच्या अंतःकरणांत सतत असते! ह्याच्या उलट ग्रामीण कलाकारांना लोकनृत्य

करतांना बाह्य जगाची शुद्धच नसते ! खरोखर बेहोश होऊन नाचण्याचा त्यांचा गुण मोठा वाखाणण्यासारखा आहे. मग त्यांच्या कलेनें वातावरण धुंद झाल्यास नवल काय !

ओघानें आल्यानें आणखी एक गोष्ट येथें नमूद करावीशी वाटते. निर-निराळ्या जमातींतील ते कलाकार नृत्याच्या प्रांगणांत उतरल्यावर स्त्री आणि पुरुष हा भेद मुळीं विसरूनच जातात. पण पुरुषांनीं नृत्य करणें ही कल्पनाच अजून आम्हांला संकोचाची वाटते ! फार उशीरानें कां होईना, रंग-भूमीवर नाटकांत स्त्री-पुरुष एकत्रित येऊन काम करूं लागले आहेत. मग नृत्यांत–लोकनृत्यांत कां नको ? पण कांहींच नव्हतें, त्यापेक्षां बरें, ह्या समा-धानाच्या भूमिकेवरून हें नृत्याचें कार्य चालू आहे. लहान मुली नृत्य करतात, पण मोठ्यांना वाव नाहीं. लोकनृत्य आणि त्याचें आम्हां शहरवासीयांच्या जीवनांत पडणारें पाऊल त्याही दिशेनें भावी कालांत पडेल ! आज प्राथमिक शाळेंतील विद्यार्थिनींपासून कॉलेजांतील विद्यार्थिनींपर्यंत साऱ्यांनीं लोकनृत्याला साद दिली आहे. विविध नृत्यप्रकारांबद्दल त्यांच्या मनांत औत्सुक्य निर्माण झालें आहे. शारीरिक शिक्षणाच्या विद्यालयांत त्याला स्थान प्राप्त झालें आहे. त्या त्या संस्थेंत शिकवणाऱ्या शिक्षकांना व शिकणाऱ्या विद्यार्थिनींना नवीन लोकनृत्य-गीतें हवीं आहेत, नव्या कल्पना हव्या आहेत. थोडक्यांत त्यांच्या आसुसलेल्या मनाला अशा गीतांची उणीव भासूं नये म्हणून हा लोकनृत्य-गीतांचा संग्रह मी त्यांच्या हातीं देत आहे. त्याचें ते स्वागत करतील, अशी आशा आहे.

अशा तऱ्हेनें हा संकालित केलेला नृत्यगीतांचा संग्रह प्रसिद्ध करण्यास ज्या कविकवयत्रींनीं उदार अंतःकरणानें परवानगी दिली त्याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद ! अनेक कामांचा व्याप मागें असून, स्वतः लक्ष घालून श्री. ग. ल. ठोकळ यांनीं हें पुस्तक प्रकाशन करण्याचें मनावर घेतल्यामुळेंच हा सर्व खटाटोप कारणीं लागला, असें म्हटल्याशिवाय राहावत नाहीं. हें ऋण शब्दानें व्यक्त करणें कठीण आहे.

कृष्णदेव मुळगुंद

# अनुक्रम

भाग १ ला : श्री. गो. नी. दांडेकर

| | | |
|---|---|---|
| १. | ठाकर गीत | ३ |
| २. | वंजारी गीत | ५ |
| ३. | धनगर नृत्य | ९ |
| ४. | एका हरिणीच्या डोळियां पाणी | १३ |
| ५. | ढोलाचा थरारा | १७ |

भाग २ रा : श्री. ग. ल. ठोकळ

| | | |
|---|---|---|
| ६. | कातकरी नृत्य | २१ |
| ७. | भिल्लांचें जग | २३ |
| ८. | कोळी नृत्य | २६ |
| ९. | गारोडी नृत्य | २८ |
| १०. | वाघ्यामुरळी नृत्य | ३२ |
| ११. | पाटलाची लेक | ३६ |
| १२. | सुगी | ३९ |
| १३. | पऱ्यांचें नृत्य | ४१ |
| १४. | शिलंगणाचे वीर | ४३ |

भाग ३ रा : कु. यशवंती गुप्ते
१५. रासणचं भै आमा नाय वो ! ४७
१६. हेल घालाया जाऊं गो चला ५०
१७. कातकरी नृत्य ५३
१८. चैत्र गौरी ५७
भाग ४ था : श्री. कृष्णदेव मुळगुंद
१९. संघ नृत्य ६३
२०. रास नृत्य ६६
२१. कोळी नृत्य ६९
२२. शेतकरी नृत्य ७३
२३. म्होरं चला (कापणी नृत्य) ७६
२४. नाखवा नृत्य ८०
२५. दाणा मोत्याचा गावला रं ८३
२६. आदिवासी नृत्य ८६
२७. नागा नृत्य ९०
२८. पाटलाचं लगीन ९३
२९. होळी नृत्य ९६
३०. महालक्ष्मी नृत्य १००
३१. गोंधळी नृत्य १०४
३२. भिल्ल नृत्य १०८

# ग्रा मी ण  नृ त्य गी तें

## भा ग - १

**गो. नी. दां डे क र**

या भागांतलि गीतांची परवानगी घेण्यासाठीं
खालील पत्त्यावर लिहा :
**श्री. गोपाळ नीळकंठ दांडेकर**
तळेगांव दाभाडे, जि. पुणें.

# १. ठाकर गीत

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान.

२. *वेशभूषा :*

पुरुषांना गुडघ्यांवर नेसलेलं धोतर, अंगांत कुडतं, डोक्यावर मुंडासं इ. स्त्रियांना गुडघ्यांवर नेसलेलं लुगडं. अंगावर कथलाचे दागिने.

३. *वाद्यें :*

ग्रामीण.

४. *निवेदन :*

ठाकर जमातीचें जीवनदर्शन ह्या नृत्यगीतांतून दाखविलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३८६८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६०६० वि: काव्य
क्रमांक ९६०६ नों: दि: २/३/६८

भलं रं, गडी ठाकर गडी, कळसूबाई आमची आई ॥ ध्र० ॥

आमुच्च्या माळावरी रं तांबड्या माळावरी रं
औत्तं हाकायचीं घाई रं पर औताला बैलच न्हाई रं ॥ १ ॥

आमुच्च्या श्येतामंदीं रं भाताच्च्या श्येतामंदीं रं
चिखुल झालाच न्हाई रं पर आवान लावायची घाई रं ॥ २ ॥

आमुच्च्या रानामंदीं रं जंजाळ रानामंदी रं
पान्यानं भरली नई रं पानी प्येत्याती गाई रं ॥ ३ ॥

आमुच्च्या कड्यावरी रं भंगाऱ्या कड्यावरी रं
वाऱ्याची वाधूळ येई रं तिनं डोंगार ठ्येवला न्हाई रं ॥ ४ ॥

आमुच्च्या घाटामंदीं रं डोंगारी घाटामंदीं रं
धावत्ती आगीनगाडी रं तिला म्होरं पळायची घाई रं ॥ ५ ॥

आमुच्च्या कड्यावरी रं बंबाळ्या कड्यावरी रं
आपुल्या पारवीपाईं रं अरं पारवा घुमत्तो काई रं ॥ ६ ॥

आमुच्च्या गांवामंदीं रं कैंबाळ्या गांवामंदीं रं
पाहुना यायाचा पाईं रं पर उप्पाशी जायाचा न्हाई रं ॥ ७ ॥

आमुच्च्या घरामंदीं रं अंधाऱ्या घरामंदीं रं
ढोलक्या बसला ठाई रं अरं झोप्येनं पेंगला काई रं ॥ ८ ॥

आमुच्च्या घरामंदीं रं मामाच्च्या घरामंदीं रं
नाचतो नाच्या घाई रं अरं चाळ बांधितो पाई रं ॥ ९ ॥

आमुच्या नाचामंदीं रं कांबळ नाचामंदीं रं
घाम गळतो भुई रं अरं नाचाची टिप्पर घाई रं ॥ १० ॥

# २. वंजारी गीत

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान.

२. *वेशभूषा :*

पुरुषांचा पोशाख–धोतर, अंगांत कुडतं, डोक्यास मुंडासं इ. स्त्रियांच्या पोशाखांत मात्र डोक्यावरून पदर.

३. *वाद्यें :*

ग्रामीण.

४. *निवेदन :*

वंजारी जमातीच्या लग्नाची कथा ह्या नृत्य-गीतांतून सांगितली आहे.



पार्श्वगायक : ऐका वंजाऱ्याच्या लग्नाची कथा
हुम्बा हो रे        हुम्बा हो रे

सामुहिक वंजारी गीत : शिवा रे सारजा        शंकर राजा
वनाच्या धेवा        रानाच्या राजा
तुझ्या दरशेना        आले वंजारे
हुम्बा हो रे        हुम्बा हो रे ॥

तुझ्या कुरपेनं        वंजारे जातीला
लुटींत भेटती        धनाचे हाण्डे
तुझ्या कुरपेनं        भरारा धावती
रातीं बेरातीं        वंजारे घोडे
हुम्बा हो रे        हुम्बा हो रे ॥

तुझ्या कुरपेनं        धरतीवरी
उभे राहिले        डोंगर कडे
तुझ्या कुरपेनं        पान्याचा मासा
आभाळामंदीं        भरारा उडे
हुम्बा हो रे        हुम्बा हो रे ॥

तुझ्या कुरपेनं        रानाच्या मंदीं
कोरड्या रुखा        पालवी फुटे
तुझ्या कुरपेनं        संभ्या वंजाऱ्याच्या
तरण्या लेकीला        दादला भेटे
हुम्बा हो रे        हुम्बा हो रे ॥

तुझ्या कुरपेनं        पेरल्या शेतीं
जवारी बाजरी        झोकांत डुल ऽ
तुझ्या कुरपेनं        उन्हाळयामंदीं
रानच्या चाफ्याला        येत्याती फुल ऽ
हुम्बा हो रे        हुम्बा हो रे ॥

तुझ्या कुरपेनं आभाळामंदून
भुरू र भुरू पावस गळ ऽ
तुझ्या कुरपेनं रंभा वंजाऱ्याच्या
साजऱ्या लेकाला बायकू मिळं ऽ
हुम्बा हो रे हुम्बा हो रे ॥

वाघाचें गर्जन : आंव् – आंव् – आंव्

पुरुष : वाघरु र वाघरु ! वाघरु र वाघरु !
व्हा ग तुम्ही मागं व्हा ग तुम्ही मागं

[ बायकांना मध्यें घेऊन पुरुष त्यांच्या भोंवताली कडें करतात ]

नवरदेव भिवऱ्या : चाल ये रे वाघरा चाल ये रे वाघरा
माझ्या तीराला फाळ पोलादी
कामठ्याला रे तानीची वादी

सामुहिक : हुम्बा हो रे हुम्बा हो रे ॥

नवरी गोजी : [ काकुळतीनें ] आर आर भिवऱ्या

भिवऱ्या : मागं हो गोज्ये !

गोजी : मागं मी भिवऱ्या व्हाऊं रं कशी !
संभा वंजाऱ्याची रांगडी लेक
शंकरामागं भिल्लीण जशी

सामुहिक : भले रे भिवऱ्या हुम्बा हो रे
भले गोजाई हुम्बा हो रे

[ भिवऱ्या बाण मारतो. वाघ मरतो. ]

भिवऱ्या : [ डौलांत ] वाघरु घ्या रे खांद्याच्या वरी
हांसत नाचत डौलांत चालं

सामुहिक : सोन्याचे दात रुप्याचीं नखं
दादलाबायकूच्या गळ्यांत घालं
हुम्बा हो रे हुम्बा हो रे ॥

शिवा रे सरजा शंकर राजा
तुझ्या कुरपेनं भिवऱ्या वंजाऱ्यानं
रानाच्या मंदीं मारिला वाघ
भला रे देवा भला रे राजा
असाच आपुल्या बिरदाला जाग
हुम्बा हो रे हुम्बा हो रे
हुम्बा हो रे हुम्बा हो रे
हुम्बा हो रे हुम्बा हो रे

## ३. धनगर नृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्रीया व पुरुष समसमान असावेत.

२. *वेषभूशा :*

गुडघ्यांच्यावर नेसलेलें धोतर, अंगांत कोपरी, मनगटांत कडं, खांद्यावर कांबळं, डोक्याला तांबडं मुंडासं अन् गळयांत गंडा-दोरा. बायकांनीं गुडघ्यांच्यावर घट्ट कासोट्याचें नऊवारी लुगडें नेसावें. अंगावर तांब्या-कथलाचे दागिने.



३. *वाद्यें :*

डिमडी, ढोल आणि झांजा.

४. *निवेदन :*

ऐका हो — ऐका, कशी पगा मजा. काय – तर म्हनं धनगर राजा. ऱ्हातुया कुटं त्ये तर सांगा. क्वोकन्यांत, दक्षिण महाराष्ट्रांत, मध्यप्रान्त, वऱ्हाड. विकतुंया गुरं, विणतुया घोंगड्या. आनिक काय करतुया ऐक रं गड्या, पाळतुया खिल्लारं, घरदार त्येच्यावर, मेंढ्या पाळून लोकर आणिक वपतुया शेळीचं दूध. राहनं असं त्येचं साधं. अन् काय तर – म्हनं – धनगर राजा— पगा तर म्होरं, कशी त्येची मजा —

**धनगर राजा वसाड गांवाचाऽ**
**येळकोट गातो मल्हारी देवाचाऽ ॥ ध्रु ॥**

**वसाड गांवाचा धनगर राजा**
**रानावनामंदीं मेंढरं पाळी**
**त्याच्यापाईं तो रानावनाच्या**
**काटेरी कुटेरी बाभळी ढाळी ॥ १ ॥**

**वसाड गांवाचा धनगर राजा**
**काळा कुत्रा त्याचा सेना रे पती**
**खायाला लागती पन्नास भाकरी**
**ईळभर तो मेंढ्यांभोवतीं ॥ २ ॥**

**वसाड गांवाच्या धनगर राजाला**
**सांगून आली काळी नोवरी**
**बावरा राजा कबऱ्या मेंढीच्या**
**लाजून गळ्यांत मिठ्ठी रं मारी ॥ ३ ॥**

वसाड गांवाच्या धनगर राजाचं
काळ्या नोवरीशीं झालं लगीन
धनगर राजा काळी नोवरी
लग्नांत जेवलीं अडीच पानं ॥ ४ ॥

वसाड गांवाच्या धनगर राजाची
काळी नोवरी रानांत आली
वाघाच्या पाठींत मारिली लाथ
उंदराला भ्याली, दूर पळाली ॥ ५ ॥

वसाड गांवाच्या धनगर राजानं
पोराच्या पायीं नवस केला
पोरं झालीं बारा, पोरी झाल्या तेरा
कबऱ्या केसांचा मेंढा कापिला ॥ ६ ॥

वसाड गांवाचा धनगर राजा
जेजुरी गांवाला गोंधळ घाली
शेकाट्यावरी काळ्या घोंगडीचा
मांडव मांडीला आभाळाखालीं ॥ ७ ॥

वसाड गांवाच्या धनगर राजाला
अंधाऱ्या मांडवीं पेटले पोत
आंधळा गोंधळी संबळ वाजवी
लंगड्या मुरळ्या नाचल्या सात ॥ ८ ॥

वसाड गांवाच्या धनगर राजाचा
घुमघुम घमामा वाजतो ढोल
फाटली धरणी, तुटल्या तारा
सुर्व्या देवाचा सुटला तोल ॥ ९ ॥

वसाड गांवाचा धनगर राजा
हांसतो नाचतो घालतो पिंगा
बख्खळ बकरीं, बख्खळ मेंढ्या
रानीं बाभळींना बख्खळ शेंगा ॥ १० ॥

## ४. एका हरणीच्या डोळीयां पाणी

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान हवेत.

२. *वेशभूषा :*

अंगात कुडतं, डोक्यावर तांबडं मुंडासं, धोतर गुडघ्यांवर नेसलेलं, हातांत कथलाचा वाळा ! स्त्रियांनीं गुडघ्यांवर नेसलेलं लुगडं. अंगावर कथलाचे दागिने.

३. *वाद्यें :*

ग्रामीण.

४. *निवेदन :*

शिकारीच्या निमित्तानं, लांडगा म्हणून चुकून मारलेली हरणी पाहून, डोळ्यांत आलं पाणी ! ती हरणी गेली. डोळ्यांतलं पाणीही गेलं. पण तिच्या जीवनाची कहाणी – सागाच्या रानांतील वारली राजाच्या जीवनाच्या कहाणीबरोबर अजून गुणगुणत आहेत कुणी ! ऐका–ऐका कहाणी...

ऐका कहाणी    ऐका कहाणी

वारली राजाच्या    सागाच्या रानीं
मोहाच्या रानीं    आंब्याच्या रानीं
लाल नागलीच्या    वरीच्या रानीं
एका हरणीच्या    डोळियां पाणी
ऐका कहाणी    ऐका कहाणी    ॥ १ ॥

वारली राजा    डोंगरचा राजा
ताठर राजा    बेडर राजा
वारली रं तू    जगाचा राजा
सावकाराला तू    भिशाल नको
पठानाला तू    भिशाल नको
फारिष्ट गार्डाला    भिशाल नको
तुझ्या रानाची    गहिरी कहाणी
एका हरणीच्या    डोळियां पाणी
ऐका कहाणी    ऐका कहाणी    ॥ २ ॥

जुना वारली    भर्थरी राजा
म्हतारा वारली    भर्थरी राजा
खांद्याला सोभे    कामठा तीर
तीराला लावली    गहिरी धार
संगे घेतले    चार वारली
सहा वारली    दहा वारली
शिकारीच्या मांगं    निघाला रानीं
काळोख्या रानीं    अंधाऱ्या रानीं
ऐका कहाणी    ऐका कहाणी
एका हरणीच्या    डोळियां पाणी
ऐका कहाणी    ऐका कहाणी    ॥ ३ ॥

सौंदडीच्या खालीं　　झुळझुळ पाणी
काळ्या अंधारीं　　खुळखुळ पाणी
तिथं रं आली　　हळूं हरणी
भितऱ्या पावलीं　　भोळी हरणी
पाय दुमडून　　पेती रं पाणी
ऐका कहाणी　　ऐका कहाणी
एका हरणीच्या　　डोळियां पाणी
ऐका कहाणी　　ऐका कहाणी　　॥ ४ ॥

लांडगा म्हणून　　भर्थरी राजानं
हरणीवरी　　धरीला न्येम
पाखरं बोलती　　"अरे अरे राजा
बिचारी हरणी　　तुझी परजा
तिच्या वरी का　　धरीला न्येम ?"
परी राजाचा　　सुटला तीर
ध्येई भेदून　　गेला रं पार
पाखरांनीं क्येला　　रानीं हाकार
तव्हा राजाला　　कळला पर्कार
राजा धावला　　उचली तिला
आलं राजाच्या　　डोळ्याला पाणी
ऐका कहाणी　　ऐका कहाणी　　॥ ५ ॥

बोले हरणी　　"रडूं नको राजा !
वारली राजा　　रानाच्या राजा
ध्येई येईल　　तुझिया काजा
वाकडीं शिंगं　　तुझ्या भित्तीला
सोभेच्या साठीं　　घेई लावूनी
मऊ रे मऊ　　माझी कातडी
घेई रं कोन्या　　साधूसंताला

ध्यान धरील बसून रानीं ”
ऐका कहाणी ऐका कहाणी ॥ ६ ॥

“ माझे रं डोळे टप्पोरे डोळे
साजिरे डोळे गोजिरे डोळे
घेईं रं कोण्या बाळाच्या आईला
बाळाच्यासाठी गरीबासाठीं
दयाधरमाचं वाहील पाणी
जगाच्या दुःखाचीं गाईल गाणीं ”
ऐका कहाणी ऐका कहाणी ॥ ७ ॥

मग हरणीनं राजाच्या कुशींत
डोळे मिटले सांडीला पराण
संपली आस संपली सास
एका हरणीची संपली कहाणी
संपली कहाणी संपली कहाणी ॥ ८ ॥

## ५. ढोलाचा थरारा

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान हवेत.

२. *वेशभूषा :*

पुरुषांना अंगांत कुडतं. डोक्याला गुंडाळलेली कापडाची पट्टी व त्यांत खोवलेली रंगीबेरंगी पिसें. कमरेस गुडघ्यांवर नेसलेलं धोतर. स्त्रियांनीं गुडघ्यांवर नेसलेलं लुगडं. केसांत निरनिराळी रंगीबेरंगी फुलें. गळ्यांत मण्यांच्या माळा इ.

३. *वाद्यें :*

ढोल-झांज इ.

४. *निवेदन :*

नर्मदा-तापी नद्यांच्या किनारीं
वावरत्याती पगा भिल्लांच्या पोरी–
पोरीच्या लग्नांत ढोलाचा थरारा
कान देऊनशनी ऐका तर खरा–
घुमतो ढोल अन् गाण्याचे बोल
तालावर पडत्याती नाचरीं पावलं–
ढोल आन् बोल, बोलती पाय
सांगू कशाला, कसं आन् काय–
पगा तर खरा–सुटलाय् वारा
ढोलाचा उमटे त्यांतून थरारा–
घुम घुम घुम–अवं, ऐका ना जराऽऽऽ

कुर्रर उई कुर्र उई दडदडा ढोलाचा घुमे थरारा
सागाच्या रानीं, खैराच्या रानीं बंबाळ्या ढोलाचा भरे थरारा ॥ १ ॥

भिल्लाच्या पोराचं झालं लगीन लग्नाला वऱ्हाडी जमले बारा
बारा रे वऱ्हाडी जमले लग्नाला ठुम्कत विहिणी चालल्या बारा ॥२॥

मामांच्या खांदीया बैसला नोवरा शिरीं मुंडोळ्यांचा वाहातो भारा
पुढ्यांत नाचती भिल्लांच्या पोरिया सैराट घामाच्या वाहाती धारा ॥३॥

टोचून पोरिया वराला बोलती कशाला फुकाचा वाहासी तोरा?
सांभाळ रे मेल्या, आपुली नोवरी डोळीया देखतां करी पोबारा ॥४॥

खांदीया कामठा, ओठावरी मिशी वाया रे जाईल फुका पसारा
नोवरी रे कशी धाकांत वागावी असावा पोराचा मनीं दरारा ॥५॥

लपालपा वाके, थराथरा कांपे खांदीं पर्पंचाचा वाहील भारा
दांडगी नोवरी नांगरा जुंपावी रानांत कामाचा आहे ढिगारा ॥६॥

कड्कडे बिजली, धरती भिजली अफाट सुसाट वाहातो वारा
पालवलीं रानीं झाडं मोहाचीं पिंपळा, पळसां फुटे धुमारा ॥७।

अल्याड नर्मदा, पल्याड तापी दोन्ही नद्यांचा ओला किनारा
किनाऱ्यावरतीं खर्बुजाची वाडी सावध डोळ्यांचा भोंतीं पहारा ॥८॥

तिथं रे ठेवावी दांडगी नोवरी तिच्या गोफणीचा वाजे घुमारा
वाडींत शिरलें चोरटें कोल्हें भिल्लाच्या बाणाला कांपे थरारा ॥९॥

निथळे वरून चांदाचें चांदणें मावळतीचा सुटेल वारा
हारपावें तेव्हां नाचाच्या लयींत सैराट घामाच्या वाहाव्या धारा ॥१०॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६०६० वि: काव्य
क्रमांक ९६०८ नों: दि: 2/3/68

# ग्रामीण नृत्यगीतें

## भाग - २

ग. ल. ठोकळ

या भागांतील गीतांची परवानगी घेण्यासाठीं
खालील पत्त्यावर लिहा :
**श्री. गजानन लक्ष्मण ठोकळ**
'कोंदण', टिळक रस्ता, पुणें २.

# ६. कातकरी नृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान असावेत.

२. *वेशभूषा :*

गुडघ्यांवर घट्ट नेसलेलं धोतर, अंगांत बंडी, हातांत कडं, कंबरेला कुऱ्हाड आणि डोक्यावर मुंडासं.

स्त्रियांचं घट्ट नेसलेलं पातळ, केसांचा घट्ट अंबाडा. केसांत रानटी, भडक रंगाचीं फुलं. गळ्यांत मण्यांचे दागिने, नाकांत चमक्या.

३. *वाद्यें :*

ढोलक आणि थाळ्या.

४. *निवेदन :*

हाय कोन हा तरी ? जंगलचा कातकरी. हा जंगलचा कातकरी, हाय कसा सांगा तरी. नाहीं पैका, नाहीं सोनं. जंगल सारं त्येचं धन. त्येच्यासाठीं त्येचं मन – उडे सदा भिरीभिरी. ऊन येवो, पाऊस येवो–संकट येवो त्येच्यावरी– समद्यावरती मात करी. हाय कोन हा तरी ? जंगलचा कातकरी. उघडं ठेवा डोळं दवान, जिवाचं करून आपलं कान – नाचगाणं ऐका देऊन ध्यान आरं पगा, पगा – पगा,

शेताविगर शेतकरी – जंगलचा कातकरी
देवाबिगर वारकरी – जंगलचा कातकरी
राघूवाणी चावा, खावा – कच्चापिक्का रानमेवा
पाणी पितो वह्व्यावरी – जंगलचा कातकरी १

घ्या कुऱ्हाड, झाड तोडा – खैराचा कात काढा
कंदमुळं परोपरी – भुईंतुनी काढा वरी
जाऊं गड्या, शिकारीला – तीर लावा कामठीला
मांस खाऊन पोट भरी – जंगलचा कातकरी २

काळ्या माशा भणाणती – मोहोळाची कुणा भीती !
झेप घेतो मधावरी – जंगलचा कातकरी
धरतीचं अंथरूण – आभाळाचं पांघरूण
माथा टेकूं धोंड्यावरी – झोप घेऊं घडीभरी ३

नगं सोनं, नगं चांदी – नगं मोती नाकामंदी
घालूं फुलं कानांवरी – माळूं फुलं माथ्यावरी
चाल चालं हरणाची – चपळाई वांदराची
लचकतो वेतापरी – जंगलचा कातकरी ४

वारा सुटे येड्यावाणी – थंड वाजे जीवघेणी
ऊन तापे डोईवरी – पर्वा त्याची कोण करी !
ढग आला काळभोर – थैय्या थैय्या नाचे मोर
नाचे तसा कातकरी – ढोलकाच्या तालावरी ५

आज इथं फूलगांवीं – उंद्यां तिथं सोनगांवीं
फिरतसे भिरिभिरी – वाऱ्यापरी कातकरी ६

## ७. भिल्लांचें जग

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान.

२. *वेषभूशा :*

पुरुषांना गुडघ्यांवर नेसलेलें धोतर, अंगांत कुडतं, डोक्यावर मुंडासं इ.

स्त्रियांना गुडघ्यांवर नेसलेलें लुगडं, अंगावर कथलाचे दागिने.

३. *वाद्यें :*

ग्रामीण.

४. *निवेदन :*

खोऊनिया पीस, सजविले केस
भिल्लं असे आले, रंगानें ते काळे
रहाणी त्येंची साधी–रहातीं डोंगरामंदी
हातांमधें तीर–कामटा–शिकार करी पटापटा
मिळेल तें खाल्लं–असा हा भिल्ल
तारप्याच्या सुरावर–नाचूं लागे झराझर
कंदी कंदी सणासुदी–ढोलकीच्या तालामंदी
भिल्लांचा नाच असा–पगायाला बसा बसा !

मोराचं पीस माझ्या केसांमधीं – माझ्या केसांमधीं
भिल्लांची जात आमची साधीसुधी – जात साधीसुधी ॥ध्रु०॥

ऊन खातों, ऊन पितों
सूर्या आग पाखडतो
भाजभाजुन रंग झाला काळा उदी – रंग काळा उदी ॥ १ ॥

गांव नको, शीव नको
छाया नको, झाप नको
ठाव ठेवूं डोंगराच्या पोटामधीं – वस्ती गुहेमधीं ॥ २ ॥

जंगलांत खाऊं चला
बिब्बा फुला, मोह फुला
रानमेवा शबरीचा खाऊं कधीं – बोरं खाऊं कधीं ॥ ३ ॥

काळारोम बाप्या गडी
कंबरेला बांधी घडी
बाईबापडीची साडी साधीसुधी – साडी साधीसुधी ॥ ४ ॥

दागिन्यांचा सोस खुळा
गोठ हातीं, पोत गळा
चांदीची चमकते हातीं मुदी – माझ्या हातीं मुदी ॥ ५ ॥

ढाण्या वाघ ढोर मारी
रगत पिऊन न्ह्यारी करी
भाल्याची फेक करूं म्होरं सिधी – गड्या, म्होरं सिधी ॥ ६ ॥

हाक घालूं, रान उठे
कामठीचा तीर सुटे
डरकाळी जिरे त्याच्या तोंडामधीं – तीर तोंडामधीं ॥ ७ ॥

देव आमचा भोळाखुळा
नागफणा शोभे गळा
माथ्यावरी धार धरी गंगा नदी – अहो, गंगा नदी ॥ ८ ॥

भिल्लिणीचा वेष धरी
शंकराला खूष करी
चाळ वाजे गवरीच्या पायांमधीं – वाजे पायांमधीं ॥ ९ ॥

पाणकळा जोर करी
मोर निळा फेर धरी
मोरिणीचा नाच बघा तालामधीं – त्याच तालामधीं ॥१०॥

तारप्याचा सूर उठे
ढोल उरीं खोल फुटे
गाणं म्हणून नाच करूं सणासुदीं – नाचूं सणासुदीं ॥११॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

# ८. कोळी नृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान असावेत.

२. *वेशभूषा :*

कमरेला चौकड्यांचा पुढें लोंबणारा त्रिकोणाकृति रुमाल. अंगांत आडव्या भडक रंगाच्या पट्ट्यांचा गंजीफ्रॉक, गळ्यांत गंडा-दोरा. डोक्याला गवळी टोपी.
स्त्रियांना गुडघ्यांवर कांचून नेसलेलें पातळ. केसांत फुलांची वेणी. अंगावर दागदागिने.

३. *वाद्यें :*

ढोलकी – पिप्पाणी.

४. *निवेदन :*

आरं—ऽऽ हा दर्यावरचा कोळी, पाठीवर हाय माऱ्यांची जाळी. शेतामंदी जसा शेतकरी, कोळी तसा दर्यावरी. आळस नाय त्येला कंदी, वल्हं हाय् हातामंदी. झापा त्येची चंदरमोळी, राहतुया तथं कोळी. आरं बाबा, मागं पग, खुलली कशी कळी. हिरवी साडी, हिरवी चोळी कोन म्हनुन काय सांगू, हाये त्येची रंगू-गंगू-

काय म्हनत्यात कोन जाणं,
आरं, ऐका, ऐका त्येचं गाणं—

दरीयाच्या शेतामंदी आपसुक माल पिकतो ॥ ध्रु० ॥

आम्ही कोळी खेळीमेळी पाण्यांत होडी सोडतों
शिडांत वारा भरला खारा, सपसप वल्हीं मारतों
कापित पाणी, चालली राणी, फेसाला भांग फुटतो
पाण्यामंदी चमचम चांदी, आम्ही जाळं टाकितों —१

चढती लाटा बारा वाटा, झोका होडीला बसतो
सुटला वारा, करतो मारा, धसका उरांत बसतो
देवाजीची किर्पा भारी, जाळं हळूंच ओढतों
बांगडा, झिंगा, मरळ, सुरंगा, मासा मस्ताड गावतो —२

चल गो गोमू, चल गो सोमू, ओढा घराचा लागतो
चालली होडी, पाणी तोडी, सपसप वल्हीं मारतों
अल्याड खाडी, पल्याड वाडी, शेंडा माडाचा डुलतो
चला मागारीं, जाऊं बाजारीं, पैका पदरीं पडतो —३

आम्ही कोळी चंदरमौळी झापामंदी नांदतों
साडी हिरवी, चोळी हिरवी, वेणी फुलांची माळतों
ओली रेती चमचम करती, चंदा वरतीं चढतो
चल गो रंगू, चल गो गंगू, ढोलकवाला घुमतो —४

चल गो नाचूं, रेती चेचूं, दरिया हमेष नाचतो
घ्या गो गिरकी, मारा फिरकी, नाचाला रंग चढतो ! —५

# ९. गारोडी नृत्य

१. नृत्यसजावट :

स्त्री व पुरुष समसमान असावेत.

२. वेशभूषा :

पुरुषांना धोतर, पैरण आणि जाकिट. डोक्यास फेटा, खाकेंत झोळी व पुंगी. स्त्रियांना नऊवारी साडी दुटांगी व घट्ट कासोट्याची नेसणें.

३. वाद्यें :

चर्म-वाद्यें व पुंगी.



४. *निवेदन :*

आला, आला, आला–गारुडी आला, या रं समद्यांनो पगाया चला. आणतो कोठून त्यो हा असा नाग ? गारुड्यांचं येक हाय् निराळं जग. तुमा-आमाला त्ये ठाव नाई. थांबा, थांबा त्यो सांगतुया कांहीं. जवान दिसतुया पगा त्यो गडी, डोलवितो नागाला कसा गारुडी. उघडली टोपली, डिंग – डिंग डिंगी...वाजू लागलीया कशी, छान छान पुंगी. पुंगीसंग वाजे पायीं पैंजण, ऐका हो ऐका, ऐका—

डिंग डिंग डिंगी – डिंग डिंग डिंगी
आला गारोडी फुंकीत पुंगी ॥ ध्रु० ॥

बघा गारोडी मोठ्या छातीचा
अंगापिंडानं चिक्कण मातीचा
लाल डोळ्यांचा, काळ्या रंगाचा
उंच, धिप्पाड सोट सोगाचा
डोईवरती फेटा नारिंगी
आला गारोडी फुंकीत पुंगी ॥ १ ॥

बाईल त्याची नवी नव्हली
काळी, कवळी, शेंग चवळी
घट्ट कासोटा, साडी दुटांगी
बाईल त्याची नाचाची रंगी ॥ २ ॥

जंगलापाशीं, वेडीवाकडी
कांट्याकुट्यांची त्यांची झोपडी
मारी कुऱ्हाड, जंगल तोडी
झाडाच्या शेंड्याचं मोहळ पाडी ॥ ३ ॥

डिंकाचं गट्टू, झाडाचा पाला
ओखदी मुळया करतो गोळा
बेत ठरला एका सकाळीं
दहा गारोडी, जमली टोळी ॥ ४ ॥

'चला धुंडाळूं रानाचा गाभा
चला गड्यांनो, धरूं नागोबा!'
पुंगी, पोतडी घेऊन संगत
निघाले रानांत, नाचत रंगत ॥ ५ ॥

वाजती ढाळ्या, वाजे पाचोळा
हुकी घालतो ढोलींत कोल्हा
वडाच्या खालीं वारूळ जंगी
लावी तोंडाला गारोडी पुंगी ॥ ६ ॥

पुंगी ऐकून बाहेर आला
फडा काढून डोलूं लागला
लाल डोळयांचा, दोन जिभांचा
फडेवरती छाप दहाचा ॥ ७ ॥

दोन गड्यांनीं फासा टाकला
चपळाईनं नाग धरला
केला नागाचा गोल गुंडाळा
गात, नाचत आले घराला ॥ ८ ॥

वाट पहाते दारांत रंगी
आला गारोडी फुंकीत पुंगी
त्याच रातीला फुस्स वाजलं
छातींत बाई धस्स जाहलं ॥ ९ ॥

त्याच नागाची आली नागीण
झेप टाकिते जशी वाघीण
डंख मारून पिंढरी फोडी
किंचाळी मारीत उठे गारोडी ॥१०॥

गेली पळून नव्हाळी नार
पिवळी धम्मक सोन्याची धार
'माझा गारोडी पाय झाडतो
देतो आंचके, मान टाकतो ॥११॥
कां रे गारोड्या, असा झोपला ?
कां रे माझ्याशीं असा अबोला ?
कां रे गारोड्या, डोळे मिटले ?
तुझ्या रंगीचें ऊर फुटलें' ॥१२॥
शिंक्यावरली उंच टोपली
खालीं काढली, केली मोकळी
'जा हो माघारीं, नागोबा देवा
तुमच्या राणीनं साधला दावा ॥१३॥
हात जोडिते, जंगलच्या देवा
माझा भर्तार माघारीं द्यावा'
फुस्स करून साद घातली
आली नागीण, मिठी मारली ॥१४॥
मिठी सुटेना, चढली गुंगी
कुठें ती पुंगी ? कुठें ती पुंगी ?
पुंगी घेऊन वाजवी रंगी
भरलं थरारा कापरं अंगीं ॥१५॥
मिठी सोडून उठे भुजंगी
तोंड लावलं डंखाच्या जागीं
समदं जहर चोखून घेतलं
कुंकू रंगीला देऊन टाकलं ॥१६॥
गेली निघून नागांची जोडी
'जागा झाला ग, माझा गारोडी !'
नाचा गड्यांनो, नाचते रंगी
नाचे गारोडी फुंकीत पुंगी ॥१७॥

# १०. वाघ्यामुरळी नृत्य

*नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान असावेत.

*वेषभूषा :*

पुरुषांना धोतर, पैरण आणि जाकिट. डोक्यास फेटा, गळ्यांत भंडाऱ्यानें भरलेली पिशवी व दिमडी. स्त्रियांना नऊवारी लुगडें व पदराला घाटी बांधलेली.

*वाद्यें :*

चौंडकं व तुणतुणें.



*निवेदन :*

खंडेराया उर्फ मल्हारी हें महाराष्ट्रांतल्या हजारों, लाखों कुटुंबांतील कुलदैवत. मल्हारीचें मंदिर जेजुरी या गांवीं डोंगरावर आहे. वाघ्या हा खंडोबारायाचा भक्त आणि मुरळी ही खंडोबाला वाहिलेली मुलगी. पूर्वीच्या काळीं देवाला मुली वाहण्याची पद्धत होती. हल्लीं ही चाल कायद्यानें बंद केली आहे. देवापुढें जागरण व नाचगाणें करायचें, हें त्यांचें काम. लग्नाच्या शुभ कार्यानंतर वाघ्या व मुरळी यांना बोलावून गोंधळ घालण्याची ,पद्धत अजूनही चालू आहे.

वाद्यांच्या तालावर वाघ्या व मुरळी मल्हारीचीं गाणीं म्हणतात. म्हाळसादेवी ही मल्हारीची बायको. पण कालांतरानें मल्हारी बानूच्या प्रेमांत पडतो व तिच्याशीं लग्न लावतो. त्याच्या ह्या- दुसऱ्या लग्नाची कथा या गाण्यांत सांगितली आहे—

येळकोट! सदानंदाचा येळकोट!

आमची जेजुरी जेजुरी—समद्या जगांत साजरी
नऊखऊ लाखांची पायरी—चढतां भेटेल मल्हारी
आमुचा मल्हारी मल्हारी—उधळूं भंडार सोनेरी

देखा मुरळीचा शिणगार, भाळीं लाविला भंडार
झोक पिवळ्या पातळाचा, हातीं घाटीचा झणकार
आली वाघोबाची स्वारी, गर्जे तोंडानें मल्हारी
दिमडीचा ठेका देतो खंडेरायाचा पुजारी

" अग मुरळे, इकडं ये ग " – " कां रं वाघ्या, कशाला? सांग "
" देवाम्होरं जाग्रण आतां करायाचं का नाय ग ? "
" करायचं, करायचं, करायचं! हब् हब् हब् ! "

" लागला लो आंबे, लागला लो – हेगड्या लो तुझ्या बागड्या लो
वाईच्या गणपती, जाग्रणा ये – पुण्याच्या पर्वती, जाग्रणा ये
तुळजापूर भवानी, जाग्रणा ये – कोल्हापूर लक्षुमी, जाग्रणा ये
जेजुरीच्या खंडोबा, जाग्रणा ये – तेहतीस कोटी देवा, जाग्रणा या
हब् हब् हब् ! "

गांव होतं चंदनपूर, तिथं ऱ्हातो एक धनगर
त्याच्या पोटीं एक पोर, जशी चांदोबाची कोर
नांव तिचं बानूबाई, काय सांगू चपळाई !
अशी हुम्मा – फुगडी खेळे, मोर नाचे थुई थुई
आली पणामध्यें पोर, लागे धनगराला घोर
" कुठं शोधावा, शोधावा हिच्याजोगता भरतार ? "
बानू म्हणे, " मी गुलजार, नका बाबा, करूं घोर
मला नेईल उचलून कुणी वाटेवरला चोर "
" माझी लेक गोरी गोरी नगं जाया चोरापोरीं "
" माझं लगीन ठरलेलं, माझा भरतार मल्हारी "
तोडलं कर्दळीचं दळ, काढलं डोळ्यांतुन काजळ
लिवलं, ' देवा, या हो या हो, माया केली कां पातळ ? '
" जा रे घेऊन हें पत्तर, आण तूं देवाचं उत्तर "
दिलं सोडून आभाळांत राजबन्सी कबूतर हब् हब् हब् !

पावलं पत्र देवाला – म्हाळसेशीं झगडा केला
थेट चंदनपुरला आला – बानू पाहून येडा झाला
वेष धनगराचा ल्याला – म्हणे, " नोकरी द्या हो मला "
दुनियेचा पालनवाला – प्रेमापायीं नोकर झाला हब् हब् हब् !

झाला खंडेराया सुन्न, बानुबिगर घेइना अन्न
म्हणे, " बानू, होई प्रसन्न, लाव माझ्यासंग लग्न "

बोले बानू, " रे रडतोंड्या, जा चार ईळभर मेंढ्या
माझा ठरलेला भरतार, देव जेजूरीचा खंड्या ! "  हब् हब् हब् !

देव साक्षात प्रगटला – संशय बानूचा फिटला
लोकरीच्या घातल्या माळा – झाल्या लग्नाचा सोहळा
घातली घोड्यावर नवरिला – देव आला जेजूरीला  हब् हब् हब् !

हातीं घेऊन पंचारती आली म्हाळसा सामोरी
पाहुन तरण्या बानाइला घाव बैसला जिव्हारीं
दिली फेकुन पंचारती, आली रागाची शिरशिरी
म्हणे, " एका म्यानीं सांगा, दोन कैशा समशेरी ? "
जुंपे सवतींचं भांडण, झाली बानाईची दैना
देव आंजारी गोंजारी, कोणी ऐकेना, ऐकेना
दिला अर्धा डोंगर हिला, दिला अर्धा डोंगर तिला
माथ्यावरला देवळांत देव एकटा राहिला !  हब् हब् हब् !

# ११. पाटलाची लेक

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान असावेत.

२. *वेशभूषा :*

खेडेगांवांतील लग्नाच्या प्रसंगीं स्त्री-पुरुषांना योग्य असे ! नृत्याला उठाव येण्याच्या दृष्टीनें भपकेदार असावेत.

३. *वाद्यें :*

ग्रामीण वाद्यें – ताशा, ढोलकी, सनई, झांज इ०

४. *निवेदन :*

ही गोष्ट हाये येक, बाळा पाटलाची लेक –
अवं – इथंच हाये मेख.
अदुगर पाटील म्हंजी काय इचारतां ! नाय पगीतलांत तुम्ही त्येस्नी पुरता – तवा त्येची पोर, म्हंजी अक्षी चंद्राची कोर ! अन् चव्हाणाचा पोर, अंगापिंडानं थोर ! मंग पदर लागाया कुठला आलाय् येळ – लगीन व्होऊन झाला सुरू संसाराचा खेळ ! पर झालं कसं समदं ? बसला कसा मेळ ?
अवं, इथंच हाये मेख – पगा आतां तुम्हीच, बाळा पाटलाची लेक –

डोंगराच्या छातीवर – कड्यापाशीं दाट झाडी
मधें घुंगट घेऊन – पहुडली दरेवाडी

दरेवाडीचा पाटील – जशी पोलादाची कांब
उंच कपाळाच्या खालीं – दिसे डोळ्यांमधें तांब

दाट, राठ ओठांवरी – लोंबे मिशांचा झुबका
बारा गांव, बारा शीव – त्याच्या नांवाचा दबका

बारा नवसांनीं झाली – बाळा पाटलाला लेक
अचपळ मुलुखाची – जशी बरचीची फेक

तळपते, फोफावते – वर चंदराची कोर
तशी दिसामाशीं वाढे – बाळा पाटलाची पोर

अंगापिंगानें दांडगा – जसा सागाचा सोडगा
चव्हाणांच्या पडळींत – आत्याबाईचा पोरगा

घर मोलाचें, तोलाचें – नाहीं पदराचा वांधा
पोर झाली उफाड्याची – बाई सोयरीक सांधा !

आले सारे गणगोत – टिळा लाविला कपाळीं
तीथ ठरे अष्टमीची – नेशीवली साडीचोळी

आलं थाटानं वऱ्हाड – काय तरी बाई तोरा
घोडं किती दामटीशी – अरे चव्हाणाच्या पोरा !

खुंट केळीचे आणवा – बांधा आंब्याच्या डहाळ्या
बसे वऱ्हाड जेवाया – वाढा पुरणाच्या पोळ्या

ताडताड वाजे ताशा – निघे सनईचा सूर
हळदीनें पालटला – नव्या नवरीचा नूर

गाल नवरीचे झाले – लाल अक्षता लागून
लेक बाळा पाटलाची – झाली चव्हाणाची सून

बाळा पाटलांनीं केला – गांवजेवणाचा थाट
वाढवाढुनी मोडलें – गांवकऱ्यांचें पेकाट
ताडताड वाजे ताशा – निघे सनईचा सूर
उरकून झाडझेंडा – झाले पाटील निसूर
लेक लाडकी, लाडकी – माय दाटे उदरांत
उसासून निरवली – चव्हाणाच्या पदरांत

# १२. सुगी

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान हवेत.

२. *वेशभूषा :*

शेतांत कामाला जातांना योग्य असे असावेत

३. *वाद्यें :*

ढोल, लेझीम, झांज इ०

४. *निवेदन :*

अरं बाबा, उगी – आली आतां सुगी !
दाणं आलं मोत्यांचं –
तवा गाणं आतां म्हनायचं –
समद्यांची हाये खुषी –
म्हणा गाणीं छान कशी –
कुणी नाय सुखी पगा, आम्हांवानी जगीं
आली आतां सुगी – नगा बोलूं, उगी —

देवाचं देणं हें देवाचं देणं – सोन्याच्या ताटाला मोत्यांचं दाणं

पिकला शाळू परोपरी
चढलीं कणसं माथ्यावरी
पांखरं आलीं भिरीभिरी
गोफण फिरवूं माच्यावरी
चला मर्दांनो, चला बायांनो, म्हणा गाणं, तुम्ही म्हणा गाणं ॥ १ ॥

सपसप फिरवूं विळे, विळे
आडवे पाडूं उभे मळे
घामाचा पाझर खालीं गळे
सुकतिल पेंढ्या उन्हामुळें
काम खुषीचं, येकामेकांचं, नगं नाणं आम्हां नगं नाणं ॥ २ ॥

मोडण झाली करून करून
घाणा खळ्याचा गेला भरून
पात जुपा रे, बैलं धरून
फुटतीं कणसं फिरून फिरून
खळं दाण्याचं, तळं मोत्यांचं, लुटूं वाण आम्ही लुटूं वाण ॥ ३ ॥

सुटला वारा, आल्या झळा
वावडणीला लागूं चला
टोपली भरून दे ग तिला
ढीग दाण्यांचा उंचावला
चंदी सालाची, किंमत मालाची करिल कोण ? अहो, करील कोण ॥ ४ ॥

आनंदाचा दिवस खरा
धनधान्याची पूजा करा
पोतीं घेऊन भरा, भरा
वाजत गाजत नेऊं घरा
नाचगाण्याची संधी सोन्याची, म्हणा गाणं, अहो, म्हणा गाणं ॥ ५ ॥

# १३. पऱ्यांचें नृत्य

१. *नृत्यसजावट :*

नाकाडोळ्यांनीं रेखीव, एका उंचीच्या अशा देखण्या मुली असाव्यात.

२. *वेशभूषा :*

झिरझिरीत रंगोबेरंगी पातळें, लांब बाह्यांचीं रंगीत पोलकीं, ओढण्या – डोक्यावरून खांद्यावर व खांद्यावरून मनगटापर्यंत, पंखांचा भास होईल अशा पद्धतीनें घेऊन मनगटाजवळ बांधणें. कमरेला शेला, हातांत-गळ्यांत जिगाचे दागिने. भांगांतून वर्ख भरणें.

३. *वाद्यें :*

तंतुवाद्यें, तबला-पेटी, इ०

४. *निवेदन :*

या या या – या तर खऱ्या —
आकाशांतून साऱ्या –! काय म्हणालांत तुम्ही ? आहांत साऱ्या पऱ्या – ! बरं, पऱ्या तर पऱ्या, या तर खऱ्या ! अग बाई, खांद्यावर पंख हे कसे ! दिसतात किती छान छान पिसें ! छुम छुम नाचत खालीं या ग ! नद्या, नाले, ओढे, लागतील दऱ्या – ! साऱ्याजणी तुम्ही या तर खऱ्या ! कशा बाई आल्या तुरु तुरु तुरु ! पहा पहा त्यांचा नाच झाला सुरू—

नाच करूं ग, नाच करूं
छुम छुम छननन नाच करूं
चल चल धरतीवर उतरूं
छुम छुम छननन नाच करूं ॥ ध्रु० ॥

मी पहिली, ही दुसरी
मी दुसरी, ही तिसरी
ओळीनें मग, या ग तरी
सुंदर पंख हळू पसरूं ग, हळू पसरूं ॥ १ ॥

रात पडे, चांद चढे
ओरडती ग रातकिडे
आनंदानें जोर चढे
हलती, डुलती ताल तरू ग, ताल तरू ॥ २ ॥

गवत किती मउ हिरवें
चल, मिळवूं हलु तळवे
मन बाई किति हळवें
लगबग लगबग हात धरूं ग, हात धरूं ॥ ३ ॥

गगन वरी नाच करी
जग अवघें फेर धरी
आज खरी, मजा तरी
नाच पऱ्यांचा होय सुरू ग, नाच सुरू ॥ ४ ॥

घ्या गिरकी, घ्या फिरकी
पूर्व दिशा हो भुरकी
भर्रकन घ्या ग, घ्या गिरकी
दहिंवर दिसतां परत फिरूं ग, परत फिरूं ॥ ५ ॥

# १४. शिलंगणाचे वीर

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान.

२. *वेषभूषा :*

सर्वांच्या परिचयाचा सण असल्यानें, वेशभूषेची कल्पना येण्यासारखी आहे. तरी पण नृत्याला उठाव येण्याचें दृष्टीनें — जरीचे लफ्फेदार फेटे, जरीचीं जाकिटें, रेशीमकांठीं धोतरें, हातांत सलकडीं इ० पुरुषांची वेशभूषा असावी. सण म्हटला कीं स्त्रियाही खूप नटणारच ! जरीचीं लुगडीं, दागिने, डोक्यांत फुलांच्या वेण्या इ०

३. *वाद्यें :*

ग्रामीण.

४. *निवेदन :*

आज सण दसरा, भेदभाव विसरा
म्हणे जो तो मुखानं, देऊनीया सोनं
करूनीया धीर, शिलंगणाचे वीर
पहा कसे चालले, सोडुनीया शेमले
बा रे तूं रे वीरा, खोवुनीया तुरा
नाचे डोले तोऱ्यांत, हलगीच्या तालांत
सनईचा सूर, ऐकून डोले वीर
असा हा सोहळा साजरा करीत आला !
आला पगा वीर ! व्हा जरा दूर !

शिलंगणाला चला,
गड्यांनो, शिलंगणाला चला

गांव सोडुनी, शीव सोडुनी, शिलंगणाला चला –ध्रु०

थंडी कवळी आली जवळी, पाणकळा संपला
भात डोलतो, तीळ नाचतो, चढला वर जोंधळा –१

नवरात्रीचा सण खात्रीचा, दीप जळत ठेवला
मातीवरतीं घट पाण्याचा पाझरता राहिला –२

दुर्गा चिडली, भिडली, लढली, महिषासुर मारिला
तिच्या कृपेनें पृथ्वीचा हा गोल फिरत राहिला –३

दर दिवसाला चढती माळा, नवधान्याचा मळा
नवव्या दिवशीं पूजा करुनी तुरा शिरीं खोविला –४

सरली सुस्ती, चढली मस्ती, मुलुखगिरीला चला
ढाल पाठिला, फाळ काठिला, कमरेला चंचला –५

टाच मारुनी घोड्यावरतीं निघे वीर मावळा
वारा सुटतो, फडफड उडतो पटक्याचा शेमला –६

म्हणतो दसरा, घरास विसरा, विसरा घरवालिला
ध्यानीं आणा शिपाईबाणा, गनीम जिंकूं चला –७

सण शूरांचा, सण वीरांचा, सण अगदीं वेगळा
नाचनाचुनी करूं साजरा दसऱ्याचा सोहळा –८

# ग्रामीण नृत्यगीतें
## भाग - ३

कु. यशवंती गुप्ते

या भागांतील गीतांची परवानगी घेण्यासाठीं
खालील पत्त्यावर लिहा :
कु. यशवंती आत्माराम गुप्ते
३०८ सोमवार पेठ, रणदिवे वाडा
पुणें २.

# १५. रासणचं भै आमा नाय वो !

१. *नृत्यसजावट :*

फक्त स्त्रिया.

२. *वेशभूषा :*

शेतात काम करतांना नेसतात त्या पद्धतीनें. दागिने थोडे.

३. *वाद्यें :*

ग्रामीण वाद्यें.

४. *निवेदन :*

" कूळकायदा, द्विभार्याप्रतिबंधक कायदा व दारूबंदी झाल्यास, शेतकरी जीवन सुखाचें होईल काय ? " असा प्रश्न मनांत डोकावत असतां वीस वर्षांपूर्वीच्या रेशनच्या जमान्यांत हें गीत रचलेलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 3६0६0 वि: काव्य
क्रमांक १६0८ नों: दि: २/३/६८

समदा काला बाजार, जग झालं बेजार
पर रासणचं भै आतां नाय वो
रासणचं भ्या आमां काय वो ! ॥ ध्रु० ॥

घरचि मीठभाकुर, खाऊं चतकुर चतकुर,
तिर्पिची ढेकर देऊं वो

केलि दारूबंदी, घालुं सोनंचांदी,
दादल्याचा मार आतां नाय वो
दादल्याचं भै आतां काय वो

आतां रामाचं राज, करूं सुखाचं साज
घरांत सवतीची किटकिट नाय वो

आला कुळकायदा, नग सावकार वायदा,
आमच्या कष्टाचं मोल आमी खाऊं वो

घरांत पोरंसोरं, गोठ्यांत गुरंढोरं,
खळ्यांत मोत्यांचं दाणं आमी पाहुं हो

मेघराजाची झालि किरपा । धरतीचि सोभा अपार हो
पेरं कराया होवं चलाया । उचल गो पाव बिगिबिगि बिगिबिगि –१

कोंवळीचा सण आला जोरांत । चला करूं लावनी हातोहात
लावनी कराया होवं चलाया । उचल गो पाव बिगिबिगि –२

बिजलिचा नाच कडाडत । पास्याचि झोड लइ अखंडित
तुडुंब शेत भरं पान्यानं । औजांचि लिगबिग रातंदिन
बेननी कराया होवं चलाया । उचल गो पाव बिगिबिगि –३

नागरपंचीचा फेर धरा । गोकुळीं खेळ दहीकाला

गौरीच्या सनाला माहेरीं चला । मायबायेचा मुराळी आला

पर कापणी कराया होवं चला । उचल गो पाव बिगिबिगि बिगिबिगी

झोडणी कराया होवं चला । उचल गो पाव बिगिबिगि बिगिबिगी –४

मळणी कराया होवं चला । उचल गो पाव बिगिबिगि बिगीबिगी

शेत आलं फुलून, भात आलं भरून, माज्या पोटांत आनंद मावनाय गो

– मावनाय गो ॥

# १८. हेल घालाया जाऊं गो चला

१. *नृत्यसजावट :*

फक्त स्त्रिया.

२. *वेशभूषा :*

नऊवारी लुगडें, ग्रामीण पद्धतीनें डोक्यावरून पदर घेऊन नेसलेलें असावें. गळ्यांत, हातांत दागिने.

३. *वाद्यें :*

ग्रामीण वाद्यें.

४. *निवेदन :*

पूर्वी आनंदाच्या प्रसंगीं केशरकुंकुमाचे सडे घालीत असत. त्याचें हें अवशिष्ट स्वरूप असावें. अजूनही खेड्यांतून ज्या घरांत पहिला मुलगा जन्मास येऊन वंशवेल फुलली असेल, त्या घराच्या पायरीवर, त्या दिवशीं गांवकरी स्त्रिया पाण्याचे घडे ओततात, गाणीं म्हणतात व आपला आनंद प्रकट करतात.

पाटलाच्या सुनेला ल्योक गो झाला ।
हेल घालाया जाऊं गो चला ।।

लिंबाच्या ढाळीनं वाडा शिंपला । हेल घालाया जाऊं गो चला ।।
आंब्याच्या पानांचा तोरण केला । हेल घाल्लाया जाऊं गो चला ।।
चाफ्यानं फुलांचा फुलोरा दिला । हेल घालाया जाऊं गो चला ।।
केळीचा लोंगर दारीं टांगला । हेल घालाया जाऊं गो चला ।।१।।

पाटलीण माझी भाग्याची थोर । पोटीं तिच्या आलं राम रघुवीर ।।
पाटील माझं भाग्याचं थोर । घरीं त्येच्या आलं किस्न यदुवीर ।।
जानकीवाणी सून सोधिली । रामसीतेची जोड सोभली ।।
रुक्मिणवाणी सून सोधिली । किस्नरुक्मिण जोड सोभली ।।२।।

इहिरिच्या घागरी भराभरा । सासबाय सासबाय, वाड्याला चला ।।
नदीच्या घागरीं भराभरा । सूनबाय सूनबाय, वाड्याला चला ।।
डव्हराच्या घागरी भराभरा । जाऊबाय जाऊबाय, वाड्याला चला ।।
साडीचोळीचा शिणगार करा । नणंदुबाय नणंदुबाय, वाड्याला चला ।।
पाटलाचा वाडा गर्जून गेला । हेल घालाया जाऊं गो चला ।।३।।

गांवदेवीला दिवा दाखवा । साडी हिरवी, खण हिरवा ।।
तांदूळ, नारळ, पानं पाठवा । गूळखोबरं दारीं वांटवा ।।
गांवठाणाला दवंडी घाला । गांवाला नवा पाटील आला ।।
कचेरीकडं महार लावा । गांवाला पाटील आला नवा ।।
उभ्या गांवाला साखर धाडा । हरखून गेला पाटलाचा वाडा ।।
माघारणींना मुराळी धाडा । गांवाला आला पाटील बडा ।।४।।

ऊठ रे सोनारा । घडव रे कडदोरा ।।
लाग रे सुतारा । पाळणा घडवायला ।।
लाग रे जिनगारा । पाळणा रंगवायला ।।
शिंपीदादा, लाग रे । आंगडीकुंची शिवायला ।।

वाणिदादा वाणिदादा, कवाड खोला । गांवाला नवा पाटील आला ।।
सनईवाला खणाणला । पाटलाचा वाडा दणाणला ।।

माळ्यानं मळा शिंपला का ? भाजीचा हारा आणला का ?
माळिणीनं माळा गुंफल्या का ? फुलांचा झेला आणला का ?
भटजीबाबा, पळा पळा । पंचाग घेऊन वाड्याला चला ॥
नांवरशीचं नांव सुचवा । केशव, माधव, गोविंद, शिवा ॥५॥

पाटीलबाबा, जेवण घाला । गांवाला नवा मालक झाला ॥
बारा मण डाळ, बारा मण गूळ । पुरणपोळीचं जेवण घाला ॥
रासणचा कायदा मोडुन काढा । आख्ख्या गांवाला जेवण वाढा ॥६॥

# १९. कातकरी नृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान असावेत.

२. *वेशभूषा :*

स्त्रियांनीं गुडघ्यांवर नेसलेलं पातळ, गळ्यांत कांचेच्या मण्यांच्या माळा, डोक्यांत फुलें. पुरुषांनीं गुडघ्यांवर धोतर आणि डोक्यांस तांबडं मुंडासं व त्यांत पक्ष्यांचीं पिसें इ.

३. *वाद्यें :*

ग्रामीण चर्मवाद्यें.



४. *निवेदन :*

माझं तर ऐका खरी, ह्यो आलाय कातकरी,
आलाय इतं आज, अवऽऽ, त्यो हाय
जंगलचं राज. त्येचं संग हाय कुनी, अरऽऽ
ती तर जंगलची रानी. मोठ्ठा राजा – सम्राट
काय करतो, तुम्हां आम्हांस्नी कळायचं नाय.
ह्यो काय करत्यो, ह्ये शहरच्या मानसांना
उमगायचं नाय.
ऐका – ऐका त्याचं समदं जीवनगीत
काय खातो, कसं राहतो, पाहूं त्येची रीत.

पुरुष : जंगलचा राज मी जंगलचा राज।
स्त्री : डोंगरमाथ्यावर तुझंच राज रं तुझंच राज।
जंगलची रानी मी जंगलची रानी
पुरुष : दरीखोरींमदीं तुझीच मानी गो तुझीच मानी।
माज्याच घरांतनं सूरज उठतांव।
स्त्री : माज्याच दारांतनं चंदर चढताव ।
पुरुष : टोपीवाला भेऊन पळून गेला ।
स्त्री : तुझ्यासि झगडाया धीर कुठं त्येला।
अरं, धीर कुठं त्येला ! ।
पुरुष : शहरबाजारीं गांधींचं राज गो गांधींचं राज
स्त्री : डोंगरघळींत पर तुझंच राज, रं तुझंच राज।
पुरुष : आमच्या घरावर कौलारू झांक, रं कौलारूं झांक
स्त्री : माझ्या खोपावर चांदनं चक, आभाल लख्ख
पुरुष : सम्रताच्या हडप्यांत माझीच धन गो माझीच धन
स्त्री : लागल तवां ती आणशिल ना पन !
पुरुष : कुणब्याच्या कणगींत माझाच भात।
माझाच भात गो माझाच भात।

स्त्री : सनासुदीला आना घरांत । राज ऽ आना घरांत ।
पुरुष : चाईचं पानी तुमीच पेवां हो तुमीच पेवां
स्त्री : शेरडीचा दूध तुमां काय ठावा ! हो तुमा नाय ठावा ॥
पुरुष : माशा उडवुनशान मधाक पिवा हो मधाक पिवा
स्त्री : करंदातोरना भुकेला खावा हो भुकेला खावा
पुरुष : हरण, घोरपड शिकार पाडा
स्त्री : भाजून खावा आन खुषींत पडा
पुरुष : आपटीच्या पानाची विडी वळुक । हो विडी वळुक ।
स्त्री : चकमक झाडुनशान विडी पेटुक । हो विडी पेटुक ।
पुरुष : मासं घोळाया नदींत मासं ।
स्त्री : विकुनटिकुनशान भात आनुचं ।
पुरुष : कुटूनकांडून घाटुक पेजुं
स्त्री : पोरासोरांस्नी घुटुघुटु पाजुं ॥
पुरुष : थंडीचा कडका, गारव्याचा मार ।
स्त्री : शेकूं व्ह वाइच आगटीच्या म्होरं

[ एक म्हातारा येतो व ओरडतो – ' अर ऽ मंग्या,
आनुं र ढोल, करूं र मंजा ' ]

सर्व : पोट भरूक आज कातोडि होडक ।
नाचगान्याची मंजा उडवुंक ॥

[ मंग्या ढोल वाजवीत येतो आणि गंग्या नवरी घेऊन येतो. ]

म्हातारा : काय रं गंग्या, आनलिव का न्होवरी ?
गंग्या : हां बाबा हां, पर बाबा, सम्रताची हाये ।
म्हातारा : असू दे रे.

[ सर्व नाचतात व गातात. ]

गंग्याची न्होवरी सम्रताची अरं सम्रताची ।
रानची केळ जनु उभाऱ्याची ।
हातभर चुडा, दंडभर चोली
सासऱ्यानं घातली पुरनाचि पोली ॥

गलाभर पोतीचा आनंद दिल्हा
बाळीबुगडीनं कान लोंबला ॥
गंग्याची न्होवरी न्हाय काम करूंची
राजारानी जनुं बसून खायची ॥

[ म्हातारा ओरडतो, "हां बाबा हां!" गंग्या व न्होवरी रागानें जातात. तेव्हां चिडलेल्या म्हाताऱ्याला उद्देशून गातात व नाचतात. ]

"अरं म्हाताऱ्या, दिवस तुझं भरलं रं बाबा
देवादारीं जवा न्हाशिल उभा।
सांग अक्षि त्येला बजावुन। कातोडिला माका लाव म्हून ॥
बामनाच्या जल्माला जाशील रं
लिवुनलिवुनशान मरशील रं ॥
कुनब्याच्या जल्माला जाशील रं
राबुनराबुनशान मरशील रं ॥
कातोडिच्या जल्माला येशिल रं
जंगलचा राजा होशिल रं ॥

# २०. चैत्र-गौरी

१. *नृत्यसजावट :*

फक्त स्त्रिया.

२. *वेशभूषा :*

नऊवारी जरीचीं पातळें, दागिने, नाकांत नथ इ.

३. *वाद्यें :*

पेटी, तबला, झांज इ.

४. *निवेदन :*

सडा, रांगोळ्या, ज्याच्या त्याच्या दारीं अन्
नटून थटून चालल्या बायका किती तरी !
अगऽऽ, आपल्यासुद्धां घरीं, आलीय चैत्री
गौरी ! जा ग जा कुणी, नका कुणी थांबू,
बोलावून आणा जा – काशी, रमा, अंबू –
आल्या कशा बघ नटून साऱ्याजणी
चैत्रगौरीचीं नाचून म्हणूं गाणीं !

आला चैत्राचा मास, सखे, करूं साज

गौरीची आरास मांडूं चला । बाई, गौरीची आरास मांडूं चला ॥
आंब्याच्या रानांत, केळीच्या बनांत, वसंत ऋतुराज विराजला ॥
उन्हानं जीव बाई उबगला । गौराई आली माहेराला ।
गौराई आली माहेराला । सोंगटीचा पट द्या खेळायला ।
खेळूं द्या आज बाई गौराईला । बाळपणींचा खेळ सारा ।
मोत्यापोवळ्यांचा हार तिला । सोन्याच्या साखळींत गुंफूं चला ।
जाईजुईचे करुं गजरे । चमेलीमोगरिचे हारतुरे ।
पांच पानांचा विडा केला । सोन्याच्या वर्खानं सजवला ।
काकड्या, खर्बुजं, कलिंगडं । रचून ठेवा गौरीपुढं ।
लाडूकरंज्या फराळाला । चांदीच्या ताटांत भरूं चला ।
पन्ह्याचा पेला पुढं करा । पंख्यानं घालूं तिला वारा ॥१॥

अशोकवृक्षाला बांधू झोंपाळा । वरी डोलवा चैत्रगौरीला ।
चोळी लिंबोळी, शालू हिरवा । पानाफुलांचा मुगुट नवा ।
हिऱ्यामोत्यांचा चुडा हातांत । सरज्याची नथ घाला नाकांत ।
नवरत्नांचा हार गळ्याला । चैत्रगौरीच्या कसा शोभला ।
आला आला ग सख्यांचा मेळा । गौरीच्या पुढं ग चला खेळा ॥२॥

[ फुगड्या खेळतात. एक जोडी उखाणा घालते. बघणाऱ्या मुली सांगतात, ' मुक्यानं फुगडी शोभत नाहीं. ' तेव्हां गटागटानें उखाणे घालून फुगड्या वगैरे खेळ खेळतात. ]

उखाणा १ ला

चैत्राच्या गौरीपुढं घालूं फुगड्या ।
हातांत गोटतोडे कानीं बुगड्या ॥

उखाणा २ रा

गौरीच्या सणाला केले बाई लाडू ।
पति नाहीं घरांत, कुणाला वाढूं ? ॥

उखाणा ३ रा

गौरीच्या सणासाठीं केल्या घुगऱ्या ॥
पति नाहीं घरांत, घालुं फुगड्या ॥

[ खेळ संपल्यावर ]

हळदकुंकू भाळीं चर्चून । चंदनाची उटी अंगीं माखून ।
रसाची वाटी, डाळीचा द्रोण । भीजदाणे द्या ओटी भरून
घ्या बाई नांव चटाचटा । नव्या नवरीचा मान मोठा ।

[ नवरी नांव घेते ]

"सोन्याचा पाऊस, मोत्यांच्या धारा
लाडक्या राणीवर अबदागीर धरा"
आला चैत्राचा मास, सखे करून साज,
गौरीची आरास सजवली ।
केळीच्या मखरीं, कमळाच्या पत्रीं
चैत्रागौरी विसांवली ॥

# ग्रामीण नृत्यगीतें

## भाग - ४

**कृष्णदेव मुळगुंद**

या भागांतील गीतांची परवानगी घेण्यासाठीं
खालील पत्त्यावर लिहा :
**श्री. कृष्णदेव मुळगुंद**
१९९/५ सदाशिव पेठ, मोडक वाडा
पुणें २.

# २१. संघनृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान असावेत.

२. *वेशभूषा :*

कांहीं पुरुषांचा पोषाख गुजराथी व कांहींचा महाराष्ट्रीय. स्त्रियाही कांहीं गुजराथी व कांहीं महाराष्ट्रीय पेहरावांत असाव्यात.

*दागिने :*

गुजराथी पद्धतीचे व महाराष्ट्रीय पद्धतीचे.

३. *वाद्यें :*

ढोलक, ढोलकी, तुणतुणें, झांज, पेटी इ.

४. *निवेदन :*

गुजराथ आणि आपला महाराष्ट्र विभक्त होतांना झाले किती कष्ट ! ही घटना जरी झाली आहे जुनी, पण ती अजून विसरले नाहींत कुणी ! एका घरांत रहाणारे दोघे भाऊ परिस्थितीनें विभक्त झाले तरी दोष नये देऊं ! उलट घर सोडतांना, निरोप देतांना परस्परांच्या समजून घेतल्या भावना ! दूर राहून सुद्धां वाढूं लागली आपुलकी. आज आपल्या देशाला हवी आहे एकी –

हातांत हात, देऊं निरोप, चला चला भरभर
ऐक मानवा, ऐक आमुचें गीत एक सुंदर ॥ धृ ॥

आम्ही चाललों गुजराथमधें, नम्र परी माथे
प्रेमभरानें नेत्र निरागस खिळवुनिया येथें
आपुलकीची पडली छाया, पहा कशी छान तर ॥१॥

विझेल वणवा मतभेदांचा, स्वतंत्र हो आपण
निश्चयाचे बांधूं आतां हातामधें कंकण
एकीचा मग नाद पडेल त्यांतून तर मधुर ॥२॥

किती काळ तरि एक दिलानें नांदत होतों बरें
विभक्त झालीं ह्यापुढें आतां आपआपुलीं घरें
मैत्री आपुली बघुन करील जग सारें आदर ॥३॥

विभक्त झालों परी मनांत किंतु नाहीं सुळीं
मातेच्या मग मस्तकिं वाहूं सौख्याच्या ओंजळी
फुलाफुलांतुन येइल अवचित सुवास चेतोहर ॥४॥

गुजराथी तूं, महाराष्ट्रीय मी, शल्य नको या मना
भारतमाते, दे दे बुद्धि – एकच ही याचना
मनामनामधें नकोच किंतु, होउं नका निष्ठुर ॥५॥

जातां जातां गतकालाचें करतों तें दर्शन
आम्ही नाचलों गर्बा करून, फेर इथें धरुन
या या या या अमुच्या संगें, करितों आर्जव
'दंडया' नाच पहा एकदां, त्यांत कसें मार्दव
'धीन्तक धीनतक्' ढोलक अमुचा, पहा कसा वाजे
कृष्ण कन्हैया आला म्हणुनी राधाही लाजे
रास गर्बा, टिपऱ्या बघुनी झालांत हर्षातुर
चला आतां तुमच्या संगें येतों खेडयावर ॥६॥

थै थै थै थै कशा नाचती खेड्यांतील कामिनी
ढोलकीच्या तालाचीही पडेल अन् मोहिनी

गा शाहीरा, दे ललकारी, चित्र कर तें पुढें
महाराष्ट्राचा वीर पुत्र जो पराक्रमानें लढे
घेउन तुणतुणें गाउं लागला, पहा कसा शाहिर
रामजोशी आला वाटे अवचित हो भूवर ॥७॥

ऐकुन कवनें मुग्ध जाहलों, थोर शाहिरी
व्यापारी जगीं एकले, लक्ष्मी अमुच्या घरीं
नाद तिचा तो ऐकून बनते जगही प्रेमातुर ॥८॥

विभागणी ही झाली म्हणून तुम्हां आम्हांमधें
मतभेदांचे मार्ग नको ते, आपण जाऊं सिधे
महाराष्ट्राच्या एकीचें हें तोरण दारावर
वदूं मुखानें एक दिलानें, भारत माझें घर
भारत माझें घर
भारत माझें घर
ऐक मानवा, ऐक आमुचें, गीत एक सुंदर ॥९।

# २०. रास नृत्य

१. नृत्यसजावट :

स्त्रीपुरुष समसमान असावेत.

२. वेषभूषा :

पुरुषांना धोतर, बंड्या रंगीत, गवळी टोप्या, कानांत बाळ्या, हातांत कडें इ.
स्त्रियांना रंगीबेरंगी घागरे, ओढण्या, चोळ्या, हातांत भरपूर बांगड्या, अंगावर दागिने मध्यभागीं श्रीकृष्णाचा वेश घातलेला मुलगा. त्याचे कपडे–पीतांबर, कमरेस शेला, मोरपिसांचा मुगुट, कानांत मोत्यांचे डूल इ.

३. वाद्यें :

ढोलक, बांसरी, झांज, टिपऱ्या—



४. *निवेदन :*

इवलाल्या मुली कृष्ण आणि गोपी म्हणून
नाचूं लागल्या, म्हणजे होतो खरा तो भास !
श्रीकृष्ण परमात्म्यानें केलेला रास, खरोखर
त्यांत दिव्यानंद आहे खास !
ह्या लहान बालिकांनीं घेतलेला नृत्याचा ध्यास–
ज्या थोरांना तो आनंद घ्यायचा असेल त्यांस-
व्हावें लागेल त्यांना नृत्यकलेचे दास !
मग आसपास, सुगंधित फुलांचा वासच वास !
क्षणभर विसरून जाल दुःख आणि त्रास—

**रास खेळूं या गोपगोपींनो —**
**नाचुं लागला वनमाळी**
**हातीं टिपऱ्या घेउनी सगळे**
**फेर धरूं या ह्या वेळीं ॥धृ०॥**
**जाईजुई ती आणि चमेली**
**शेवंतीसह आली अबोली**
**सोनचाफा तसा मोगरा**
**प्राजक्ताचा पडे पसारा**
**तुरा खोऊनी डोईंत, भाळीं**
**नाचूं लागला वनमाळी ॥१॥**
**हातीं टिपऱ्या घेऊनी सगळे**
**फेर धरूंया ह्या वेळीं ॥**
**फुलें वेंचुनी करुं या माळा**
**वनमाळीच्या गळ्यांत घाला**
**केशरकस्तुरी, लावुनी गंध**
**दरवळे भवतीं कसा सुगंध**
**यमुनेवरतीं नाचूं सांजसकाळीं,**
**नाचुं लागला वनमाळी ॥२॥**

हिरवळीवरच्या मखमलीवर
मंगल क्षणीं या सारे घडीभर
दवडूं नका ग क्षणही वाया
सजवुन या या अपुल्या काया
नेसून वस्त्रें हिरवीं पिवळीं
नाचुं लागला वनमाळी ॥३॥

घेऊनी पनघट आल्या गौळणी
रासाची ती मुखांत गाणीं
देहभान त्या विसरून गेल्या
कलिका साऱ्या हंसल्या, फुलल्या
प्रीत अंतरीं कवटाळी,
नाचुं लागला वनमाळी ॥४॥

वनांत सोडुन साऱ्या गाई
पेंद्या आला करुनी घाई
धांवत धांवत सारे आले
अवचित येउन कितीक रमले
एकामागुनी धरुनी ओळी —
नाचुं लागला वनमाळी ॥५॥

# २१. कोळी नृत्य

१. *नृत्यसजवट :*

स्त्रीपुरुष समसमान असावेत.

२. *वेशभूषा :*

पुरुषांना रंगीत चट्यापट्यांचे गंजीफ्रॉक्स, कमरेस रंगीत त्रिकोणाकृति दुमडून बांधलेले मोठे रुमाल अगर फडकीं, डोक्यांना गवळी-टोप्या, कानांत बाळ्या, हातांत कडीं इ. स्त्रियांनीं नऊवारी लुगडें वर कांचून नेसावें. रंगीत चोळ्या, डोक्यांत फुलें—

३. *वाद्यें :*

ढोलकं, पिपाणी—



४. *निवेदन :*

कोळ्यांच्या जीवनांतील ही एक साधी घटना आहे. नेहमीं सागरांत फिरणारी होडी, कधीं दुरुस्तीसाठीं तर कधीं कांहीं अडचणीसाठीं पाण्याबाहेर रेतींत ठेवलेली असते! पुन्हां जेव्हां ती होडी सागरांत न्यावयाची वेळ येते, तेव्हां रेतींतून ओढून नेतांना त्यांची चाललेली धडपड–गडबड–बडबड मोठी गंमतीदार असते. नादुरुस्त मोटार रस्त्यानें ढकलतांना–मध्येंच 'फुर्रर' म्हणून सुरू झाली कीं, जो आनंद ढकलणाऱ्यांना – तसाच आनंद, आपली होडी पुन्हां एकदां सागरांत गेली, डौलानं डोलूं लागली म्हणजे कोळ्यांना होतो. पहा – पहा त्यांची धडपड – गडबड...

ह्यौ ऽऽ हिक्, ह्यौ ऽऽ हिक्, ह्यौ ऽऽ हिक्

वढा रं व्हडी – वढा रं व्हडी
वढा रं बिगी बिगी व्हडी ॥ ध्रु० ॥

वढा रं व्हडी ह्यौ हिक्
वढा रं व्हडी ह्यौ हिक्
हलेना व्हडी, कशि अजुन खडी !
वढा रं बिगी बिगी व्हडी – ॥ १ ॥

पल्याडला जा रं तुमी
हकडून जातुय आमी
पान्यांत मारा समदे उडी
वढा रं बिगी बिगी व्हडी — ॥ २ ॥

खालीं टाका वंडका
हातीं घ्या रं दांडका
जाईल पगा आतां जनुं-गाडी गाडी गाडी
वढा रं बिगी बिगी व्हडी – ॥ ३ ॥

हो – हो – हो ऽऽऽ
हलुहलु ढकला
पाय माझा माखला
जीव लई थकला
नगा कुणी थांबूं, ही मोलाची घडी
वढा रं बिगी बिगी व्हडी – ॥ ४ ॥

व्हडी गेली पान्यांत
लाटांच्या मान्यांत

डुलतीया तोऱ्यांत
पश्चिमेच्या वाऱ्यांत
दंग तुमी गान्यांत
ओ ऽऽ ओ ऽऽ आतां लई गोडी
आतां लई गोडी
व्हलवा रं व्हडी – व्हलवा रं व्हडी ॥ ५ ॥

## २२. शेतकरी नृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्रीपुरुष समसमान असावेत.

२. *वेशभूषा :*

शेतांत कामावर जातांना योग्य असा पोषाख असावा. त्याचप्रमाणें स्त्रियांचाही असावा.

३. *वाद्यें :*

ढोल, झांज इ.



४. *निवेदन :*

शेतकऱ्यांचें रोजचेंच तें कष्टाचें जीवन- पण त्यांतून ते फुलवतात समाधानाचे क्षण ! सगळ्यांनीं उठून कामावर निघावें, काम करतांना आनंदानें गाणें गावें. मोट ओढतांना बैलांना रिझविण्यासाठीं तर शेतांत काम करतांना मनरंजनासाठीं. पहा- पहा कसे निघाले मळ्यांत- हात घालून गळ्यांत...

हो ऽ ऽ ऽ ऽ या रं, या रं, या रं, या रं या ऽ ऽ ऽ ! हो ऽ ऽ ऽ

जाऊं चला समदे-हात घालुन गळ्यांत
काम करूं खळ्यांत-शेतांत, मळ्यांत ॥ ध्रु० ॥

कुई कुई कुई कुई मोट पगा वाजे
नोकर कुनी नाय, आपुन आपलं राजे
घामाचे मोती जनुं आपल्या गळ्यांत

काम करूं खळ्यांत-शेतांत, मळ्यांत ॥ १ ॥

दिवस येईल मंग पगा वर वर वर
कामं करूं चला आतां झर झर झर

हाये खरी गोडी हो भाकरी शिळ्यांत- ॥ २ ॥

खळ्यावर धान्याची रास पगा लई
नाचूं तिच्यामंधीं थुई थुई थुई
पुरे बाई-नको बाई, ही तुमची घाई
नाचूं तिच्यामंधीं थुई थुई थुई

कुनी मंग आम्हास्नी काढूं दे खुळ्यांत ॥ ३ ॥

घ्या रं घ्या रं संगं कुनी बैलांची जोडी
खांद्यावर अपुल्या टाका घोंगडी

झोप कशी तथं येतीय् भरूनशान डोळ्यांत ॥ ४ ॥

आंब्याच्या झाडाखालीं बसा बसा
घडीभर इसावा घ्या तुमी कसा

घेऊनशान इसावा पाणी पिऊं तळ्यांत ॥ ५ ॥

ग्येलं समदं खालीं खालीं पार आतां ऊन
गार वारा वाहतो, डोलत्याती पानं
नाचूं चला समदे हात घालून गळ्यांत

काम झालं खळ्यांत–शेतांत, मळ्यांत ॥ ६ ॥

## २३. म्होरं चला

### ( कापणी-नृत्य )

खरें म्हटलें म्हणजे, ढोल–लेझीम हेंच महाराष्ट्राचें लोकनृत्य. परंतु त्याही पलीकडे जाऊन इतर प्रांतांतील शेतकऱ्यांप्रमाणें लोकनृत्याच्या पद्धतीनें आपल्या शेतकऱ्यांचें हें जीवन-दर्शन–

१. *वेशभूषा :*

शेतकऱ्यांची वेशभूषा सर्वपरिचित आहेच. परंतु वास्तवापेक्षांही नृत्यसजावटीसाठीं शेतकऱ्याची वेशभूषा जास्त कलात्मक असावी. ह्या नृत्यांत स्त्रिया व पुरुष समसमान असावेत.

२. *वाद्यें :*

ढोल, लेझीम, झांज, ताशा, हलगी इत्यादि.

३. *निवेदन :*

कोंबडा आरवला. दिस कासराभर वर आला. सुगीचं ह्ये दिवस. मंग हातपाय गाळूनश्यान व्हं कसं जमायचं! ‘ जागं व्हा, जागं व्हा ’ म्हणत समदीं बायका-पोरं उठत्यात. शेतांत जायाची एकच गडबड उडती. सूर्यनारायण आता चांगलाच वर आलेला असतो. जोंधळ्याच्या पातीच्या पाती उपटून पडतात. बांधावरचं गवत कापलं जातं. त्याच्या जुड्या

बांधल्या जातात आणि गवताची गंज चढते. इकडं बायामाणसांचा कणसं मोडायचा झप्पाटा वाढतच असतो. काम शिगेला पोचत असतं. कुणी बाया उपणीनं कणसं खळ्यांत वतत्यात. एव्हांना सूर्य डोक्यावर येतो.

भाकर-तुकडा खाऊन गडी-माणसं जरा इसावत्यात. सूर्य डोंगराकडं कलतो आणि मग पुन्ना कामाची जुपी होते. ढवळ्यापवळ्यांकडनं कणसं मळलीं जातात. धान्याची मळण तिवड्यावरनं वावडण्यांत येते आणि मग– मग 'दाणा मोत्याचा' गवसतो. कारभाऱ्याच्या अन् कारभारणीच्या आनंदाला सीमाच राहत नाही. धान्याची रास पोत्यांत भरून घराकडे नेण्यांत येते. पण रस्त्यांत– गांवच्या शिवेवर आल्यावर शेतकऱ्याची गाडी थांबते. त्याचं मन उचंबळून येतं. ह्याच देवीला त्यानं नवस केलेला असतो. मोठ्या भावभक्तीनं देवीला निवद दावून, जरा वेळ विसावून, भरल्या मळवटानं लक्ष्मी धन्याच्या घरांत प्रवेश करते–

**जागं व्हा– जागं व्हा– जागं व्हा–**
**म्होरं चला– म्होरं चला– म्होरं चला–**

**कोंबडा लागलाय् आरवायला**
**झोपूं नगा रं चला– चला–**

**शेतांत जाऊं या कामाला– रं कामाला**
**म्होरं चला– म्होरं चला– म्होरं चला–**

**म्होरं चला आतां चला म्होरं,**
**कापणी करा आतां भराभर ॥ ध्रु० ॥**

उच, उच गवत वाढुन चाललय्
वाऱ्याच्या झोतानं वाकून गेलय्
इळा चालवा तुमी झराझर
पाखरं बसत्याल रं ऽ ऽ कणसांवर
म्होरं चला आतां, चला म्होरं
कापणी करा रं भराभर ॥ १ ॥

गवताची बांधा एक–एक जुडी
चढवा गंजीवर लाऊन शिडी
हातांत तुम्ही घ्या सरासर सरासर
झट्पट् झट्पट् झट्पट्
डोंगरावानी पगा झालं शिखर ॥ २ ॥

कणसं मोडूनशान कडाकड
खळं करा मंग चहूकडं
धान्याची रास बी चढली वर
मोत्यावानी रं ऽ ऽ दाना टप्पोर ॥ ३ ॥

भरा–भरा समदीं पोतीं भरा
जाऊं आपुन आपल्या घरा
घेऊन हौश्या-पवळ्या प्यार ऽ ऽ
झोकांत चाललाय् कसा हुशार ऽ ऽ
डौलांत पळतोय् कसा हुश्यार ऽ ऽ
थुई–थुई नाचतोय् वाऱ्यावर
अरं हो– हो– हो– हो– ऽ ऽ ऽ ॥ ४ ॥

थांबवा थांबवा बैलाला
झाडाच्या बांधू या सावलीला
देवी पावलीया नवसाला
ओटी भरतुया आमी तिला

बसा–बसा बाई घडीभर
कापणी झाली कशी भराभर ॥ ५ ॥

पूजा बांधलीया छान्– छान्–छान्
ढोल वाजवूं या धीन्– तान् धीन्– तान्
लेझीम खेळूं या छीन् छन्–छीन् छन्
नाचूं आपण तालावर–तालावर–तालावर
गुलाल उधळूं अंगावर–अंगावर–अंगावर ॥ ६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३६०६० वि: काव्य
क्रमांक १६०८ नो. दि: २/३/६८.

# २४. नाखवा नृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्रिया व पुरुष समसमान.

२. *वेशभूषा :*

पुरुषांना डोक्यास गवळी टोपी. अंगांत तांबड्या, पिवळ्या, हिरव्या आडव्या पट्ट्यांचा गंजीफ्रॉक, गळ्यांत रंगीत रुमाल बांधलेला. कमरेला रुमालाची घडी त्रिकोणाकृति बांधलेली. गळ्यांत ताईत, कानांत बाळी आणि हातांत कडं. स्त्रियांचं लुगडं अगदीं कांचून वर नेसलेलं. गळ्यांत दागिने, नाकांत नथ, हातांत बांगड्या, भडक रंगाची चोळी, डोक्यावर फुलांची वेणी.

३. *वाद्यें :*

ढोलकं, पिपाणी इत्यादि.

४. *निवेदन :*

जसं शेतकऱ्याचं – तसंच आपलं सारं जीवन सागरावर वेंचणाऱ्या कोळ्यांचं हें जीवन-दर्शन आहे. सागराच्या लाटेप्रमाणें नर्तनाचं अंग कोळ्यांना जणूं उपजतच. नृत्याची दृष्टि त्यांना खचित आहे. त्या कलेचा आनंद उभयतां स्त्री-पुरुष पुरेपुर घेत असतात. सागराच्या रेतींत, ताडा-माडांच्या छायेंत आपलं जीवनगीत गात, वल्हं घेऊन धरणीवर ते सागराचा भास निर्माण

करतात. सकाळीं उठल्यापासून सायंकाळ-
पर्यंतचं समींदरावरचं दर्शन ते घडवतात. पहा—
वल्हीं हालूं लागलीं – व्हडी डोलूं लागली—

नाखवेवाल्यांनो समदे या रं ऽऽऽऽ
हुं ऽऽ हूं, हुं ऽऽ हूं, हुंऽऽ हूं, हुं ऽऽ हूं, हुं ऽऽ हूं,
व्हलवा रं व्हलवा नौका व्हलवा
नाखवेवाल्यांना समदे बोलवा – या रं ऽऽऽ ॥ ध्रु० ॥

पाठीवर जाळं, पायांत चाळ, तोंडांत शीळ,
समींदराला ह्या खुलवा – ह्या खुलवा
खुलवा रं खुलवा, राजाला खुलवा
लाटांवर मंग त्या झुलवा
झुलवा रं झुलवा – नाखवेवाल्यांना समदे बोलवा, या ऽऽऽ रं ॥ १ ॥

हातांत काठी, पोटासाठीं पडल्या गांठी
जोसांत व्हडी तुमी चालवा – तुमी चालवा
चालवा रं चालवा, खुश्याल चालवा,
भिती कसली ! तुमी घालवा
घालवा रं घालवा – नाखवेवाल्यांना समदे बोलवा या ऽऽऽ रं ॥ २ ॥

कशास घोर, शिडाचं दोर, मायेचं पोर
पान्यांत व्हडी ही हलवा – ही हलवा
हलवा रं हलवा, बिगी बिगी हलवा
जीवन आपलं हये फुलवा
फुलवा रं फुलवा, नाखवेवाल्यांना समदे बोलवा, या ऽऽऽ रं ॥ ३ ॥

साधून मोका लंगर टाका
वढून दोर रं खालीं वाका
झर झर झर झर जाळं फेका –
पान्यांत सळसळ ऐका ऐका
गावला रं गावला, मासा गावला ॥ ४ ॥

जाळ्यांत मासा, गांवला कैसा मिळेल पैसा
जाळ्यामधून तो सोडंवा – तो सोडवा
सोडवा र सोडवा, हळुहळु सोडवा
कारभारणीला तुमी बोलवा – तुमी बोलवा, एऽऽऽ कारभारणी ॥ ५ ॥

नको रं बडबड, थांबवा गडबड, माझ्याची तडफड
त्यावर तुमी सुरी चालवा – सुरी चालवा
चालवा रं चालवा, चरचर चालवा
पाटीमंदीं अन् जुलवा
जुलवा रं जुलवा – नाखवेवाल्यांना समदे बोलवा, याऽऽऽ रं ॥ ६ ॥

कशास खोटी, करुनी दाटी, घ्या गो पाटी
तराजूमंदीं तुमी तोलवा – तुमी तोलवा
तोलवा गो तोलवा, इथंच तोलवा
बाजाराला चल पलवा
पलवा रं पलवा – पलवा रं पलवा – ॥ ७ ॥

# २५. दाणा मोत्याचा गावला रं

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान असावेत.

२. *वेशभूषा :*

पुरुषांना फेटे, मलमलीची पैरण, त्यावर जाकीट, हातांत कडं, तलम धोतर अशा रंगेल थाटांत पुरुष आणि स्त्रियाही तशाच नटल्या-मुरडलेल्या.

३. *वाद्यें :*

ढोलकी, हालगी, झांजली इत्यादि.

४. *निवेदन :*

पाऊस–पाणी चांगलं होऊन, सोळा [आणे पीक आलं म्हणजे शेतकऱ्यांचा आनंद गगनांत मावत नाहीं. कणसांत पहिला दाणा पडला म्हणजे होणाऱ्या शेतकऱ्याच्या आनंदाचं वर्णन शब्दांत करणंच शक्य नाहीं. त्याच्या कारभारणीपासनं पोरासोरांना कोण आनंद होतो ! साऱ्यांचे चेहरे आनंदानं] उजळतात. डोळे आनंदानं फुलतात. सारे कष्ट फळाला येतात आणि मग–जो तो एकमेकाला म्हणतो– " दाणा मोत्याचा गावला रं ! "

गांवकऱ्यांनो, सांगतों ऐका,
आम्ही आणि आमुच्या बायका
खंडोबाच्या जत्रेला
आलों आमी अवंदाला
पगूं नका– थांबूं नका,
गांवकऱ्यांना द्या हांका — या ऽऽऽ रं
बिगी बिगी बिगी बिगी या ऽऽ रं ॥
अवंदाच्या वर्सांत, कितीक जोरसांत,
आलं आलं बरसात – माझ्या ग परसांत
दाणा मोत्याचा गावला रं ऽऽऽ
दाणा मोत्याचा गावला रं ॥ ध्रु ॥

नांगराला बैल जवा का जुंपला,
शेताच्या पेटींत दाना ठेऊन संपला
मोत्यानं भरला पुना माझा शिंपला,
टपोर गोल पिवळा रं –
दाणा मोत्याचा गावला रं ऽऽ ॥१॥

समींदराच्या खालीं खोल – खोल,
चिखला-पाण्यानं आलीया ओल
चिखलांतुन त्या – पाण्यांतुन त्या
सजीव उमटे लई गोड बोल
कणाकणांतून दावला रं ऽऽ
दाणा मोत्याचा गावला रं ऽऽ ॥२॥

निढळ्या घामाचं घातलंया पाणी,
सगे, सोयरे तूं आणि मी
जवा का झालीया आकाशवाणी
" मेघराजा पावला रं ऽऽ
मेघराजा पावला "
दाणा मोत्याचा गावला रं ऽऽ ॥३॥

नको गळ्यांत परी ह्ये मोती
कण कण वेचुन भरुं या पोतीं
भाजी-भाकर खाऊं चपाती
आजवर जीव कावला रं ऽ ऽ
दाणा मोत्याचा गावला रं ऽ ऽ ।।४।।

नका चालवूं, थांबवा मोट,
बैलांचं हो भरुं द्या पोट
कणसं तोडूनशान घाला हो घाट
जीवाला जीव लावला रं ऽ ऽ
दाणा मोत्याचा गावला रं ऽ ऽ ।।५।।

पाठीवर घाला रेशमी झूल,
राणीच्या डोईंत खोऊन फूल,
गाडींत बसवा बायका अन् मुलं,
सुगीचा दिवस सरला रं ऽ ऽ
माहीचा मास आला रं ऽ ऽ
दाणा मोत्याचा भरला रं ऽ ऽ ।।६।।

कामाची नाय रं आतां आंच
पहाटचं वाजूं दे खुश्याल पांच
कोल्हाटणीचा करवूं या नाच
छुम – छुम – छुम – छुम – छुम –
जत्रेला रंग भरला रं ऽ ऽ
नाच – गाणं खुललं रं ऽ ऽ
पैशाचं पाकीट सरलं रं ऽ ऽ
जीवन आपलं फुललं रं ऽ ऽ
दाणा मोत्याचा गावला रं ऽ ऽ ।।७।।

## २६. आदिवासी नृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान असावेत. वाद्यें वाजविणारे लोक नृत्य करणाऱ्यांच्या मध्यभागीं.

२. *वेशभूषा :*

बायका लुगडें गुडघ्यांच्या वर अगदीं काचून नेसलेल्या असाव्यात. अंगांत भडक रंगाच्या चोळ्या. पुरुषांनीं धोतर लुंगीवजा गुंडाळलेलें असावें. अंगांत जाकीट. डोक्यांना टापऱ्या.

३. *दागिने :*

कांचेच्या मण्यांच्या माळा, कथलाच्या बांगड्या इत्यादि. केसांत फुलांच्या माळा.

४. *वाद्यें :*

चर्मवाद्यें, थाळी इत्यादि.

५. *निवेदन :*

तडफदार अन् रसरशीत जीवन जगण्यासाठीं आदिवासी लोकांची कोण धडपड! हिरव्यागार, गर्द झाडांझुडुपांतून सळसळत जाणाऱ्या नागासारखे ओढे अन् ओहळ हेच त्यांचे कौतुकाचे विषय. गर्द आणि भयप्रद जंगल हेंच त्यांचं जग. हें जीवन मनाला जितकं मोहविणारं, दृष्टीला सुखविणारं, तितकंच भीतीचं, धाडसाचं

नि धडाडीचं. जिथं दिवसाढवळ्या रानटी, क्रूर जनावरं फिरतात, तिथंच, त्याच जंगलांत ' जंगलचा राजा ' म्हणवून घेणारा निधड्या छातीचा, धट्टाकट्टा आदिवासी ह्या साऱ्या संकटांशीं झुंज देत देत वीराचं जीणं जगत असतो.

परंतु वाघाशीं दोन हात करणारा हा तगडा वीर ' मेघराजानं कोप ' केला तर गरीब गाय होतो, व्याकुळ होतो. त्याचं मन तडफडतं. एखाद्या पांखरागत. त्याचे करारी डोळे ओलावतात अन् त्याचा उमदा-तजेला-टप्पोरा चेहरा सुकून जातो. त्याच्या जीवाची विलक्षण तडफड होते. तो देवाची करुणा भाकतो, नवस करतो. आणि–आणि—

त्याच वेळीं आकाशांत बिजली चमकते. त्याचे टप्पोरे डोळे आनंदानं फुलतात. मन आनंदून उठतं. हृदयाला सुखाची भरती येते. विजेच्या लखलखाटानं तो बेहोष होतो आणि–आणि–दुःखाची आवस सरून आनंदाची, आशेची पुनम उगवते आणि त्या पिठोऱ्या चांदण्यांत, वाद्यांच्या तालांत तो बेहोष होऊन नाचूं लागतो—

**कहानी ऐक रं गुनवंता – गुनवंता**
**गुनवंता – गुनवंता – गुनवंता – भगवंता ।।**
**मेघराजा, कोपलासा कां रं – कोपलास कां ?**
**आमच्यावरी रुसलास कां रं – रुसलास कां ?**
**तुझ्याविना रं ऽऽ पळालं पाणी**

वनराजा हा आनिक रागी
गात नाहीं रं गानं कुणी
दीन झालीया त्येंची वाणी
पोरं रडती अन् बायका – अन् बायका – अन् बायका
मेघराजा, कोपलास कां रं – कोपलास कां ? ॥१॥

कोल्ह्यातरसाची नाय रं भिती
वाघलांडग्यास्नी देऊं रं माती
डाकिनी – शाकिनी आमच्या हातीं
खुषीनं करुं आमी साऱ्यांची शांति
पर जीवास लागलाया लइ चटका
मेघराजा, कोपलास कां रं – कोपलास कां ? ॥२॥

पळसाचीं झडलीया सारीं पानं,
उजाड बनलीया आमचीं रानं
खोपट्यांत नायी दाना–वैरण
हरपलं आमचं सारं भान
व्हईल कां रं भार हलका – भार हलका ?
मेघराजा, कोपलास कां रं – कोपलास कां ? ॥३॥

गेल्या सालाला कसा रं पावला –
दाणा मोत्याचा शानदार गावला
गगनांत आनंद नाय् मावला ऽऽ
आवंदाला राग मंग कसला धरला ?
झाला भगत कां तुज परका – तुज परका – तुज परका ?
मेघराजा, कोपलास कां रं – कोपलास कां ? ॥४॥

आला – आला श्रावण – श्रावण – श्रावण
नाय तुझा रं, ठाव – ठिकाण – ठाव – ठिकाण – ठाव – ठिकाण
क्षणांत ढग रं क्षणांत ऊन – क्षणांत ढग रं क्षणांत ऊन
व्हईल कसं म्होरं, हयो धसका – हयो धसका – हयो धसका
मेघराजा, कोपलास कां रं – कोपलास कां ? ॥५॥

जीव-जंतुचा आधार पाणी
देनार नाय रं आनिक कोणी
करसाळ गोंड गातुया गाणीं
संगाती हाय् रं त्येची राणी
खुषींत ठेविल मारुन मुरका
मेघराजा, कोपलास कां रं – कोपलास कां ? ॥६॥

करतुया आता नवस
पाड – पाड देवा पावस
पान्याची फेड रं हौस
नगं – नगं राग दावूंस
गोंड झालाय् पग पोरका – पग पोरका – पग पोरका
मेघराजा, कोपलास कां रं – कोपलास कां ? ॥७॥

रान जाळीचं जंगल
जीवाशिवाची दंगल
रानपांखरू रंगलं
इथंच आमचं मंगल
गेली पर ती छाया
दाव – दाव रं देवा, माया
पडतो आमी पाया –
फुलंल मंग ही काया –
मेघराजे, या या, या या या या या ऽऽऽ
हो ऽऽऽ चमचमली बिजली
अमृतानं भिजली
धरतीमाता सजली
डोलत्याती कणसं – हालत्याती फणसं – बोलत्याती कोनसं
कुहू ऽऽ कुहू ऽऽ कुहू ऽऽ
मेघराजा पावला रं – पावला रं – पावला रं !

# २७. नागा नृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान असावेत.

२. *वेशभूषा :*

पुरुषांच्या मस्तकास रंगीबेरंगी शिंगांचें शिरस्त्राण. शिंगाच्या दोन्ही बाजूंना केसांचा गोंडा आणि मध्यभागीं पक्ष्याचीं पिसें. कमरेस निरनिराळ्या पानांच्या माळा व पक्ष्याचीं पिसें. गळ्यांत हाडकांच्या माळांचा भास निर्माण होईल अशा माळा असाव्यात. हातांत व दंडावर अशाच माळा असाव्यात. चेहऱ्यावर पिवळा, तांबडा, काळा व पांढरा ह्या रंगांचे पट्टे असावेत. शिरस्त्राण सोडून स्त्रियांची वेशभूषा पुरुषांप्रमाणेंच असावी. फक्त रंगीत कापडाची पट्टी डोक्याभोवतीं बांधून त्यांत पिसें खोवावींत.

३. *वाद्यें :*

गंभीर आवाजाचीं चर्मवाद्यें.

४. *निवेदन :*

ब्रह्मदेश व आसाम यांच्या दरम्यान एक अगदीं अप्रसिद्ध डोंगराळ प्रदेश आहे. त्या ठिकाणीं प्राचीन काळीं ‘ नाग ’ जातीचे लोक राहत असत. त्यांचें मूळ ठिकाण वगैरे अज्ञात आहे. सध्यां त्या जमातीचे लोक कांहींसे

सुधारलेले असले तरी त्यांतील परंपरागत योद्धे अद्यापि आढळून येतात. ते आपलें मस्तक विशिष्ट प्राण्यांच्या शिंगाच्या शिरस्त्राणानं सजवितात. त्या शिंगांना मनुष्याच्या केसांचा एक झुपका—गोंडा लटकत ठेवतात. गळ्यांत माळा. त्यासुद्धां हाडकांच्याच. कमरेला पानं, चेहरे भडक रंगाच्या चट्या-पट्यांनीं रंगवलेले.

या थाटांत गंभीर चर्मवाद्यांच्या तालावर ते नृत्य करतात. नृत्याचा विषयसुद्धां शिकारीचा—लढाईचा अगर शत्रूचा माणूस गांठून त्यावर हल्ला करण्याचा...

हा...है...हः हः है
जमूं...जमूं...जमूं...जमूं... ॥ ध्रु० ॥

वनराईंतून सारे जमूं...जमूं...जमूं...जमूं
शिकार आली, सावध झाली, लपून खालीं बसा
बसा रं आपुल्या जागंला, नका कुणी रं गमूं ॥ १ ॥

हळुहळु सरका, दिसेल बरंका, काम तुमी उरका
घालून घाव सावजाला, हा...हा...हा...
धरून बाण, जोसांत ताण, घेऊन प्राण......
आणूं या आपुल्या शिवाराला, हो शिवाराला
नका कुणी रे रमूं ॥ २ ॥

सोडून भान, तुडवा रान, धरून मान
बांधून घाला झाडाला
चढवा माचा, त्यामंदीं खोचा, भवतीं नाचा
वाजवा ढोल, चला पळा
ढाण...ढिण...टक्...ढिण
नका कुणी रे दमूं ॥ ३ ॥

कसला वांधा ! धरून बांधा, हातावर गोंदा
सजवा बळी द्यायाला
घ्या, घ्या हिलाल, उधळा गुलाल
गानं लागा रं गायाला, तुमी गानं लागा रं गायाला
नका कुणी रे नमूं ॥ ४ ॥

पावन्या रं, तुझं नांव काय ?
झाडूं नगं हातपाय
रडशील पग धाय...धाय...धायधाय...
आरं ! ह्याचं नांव रामू अन् बायली म्हनतीया यमू
रामूभवतीं जमूं, यमूभवतीं जमूं
जमूं...जमूं...जमूं...जमूं...जमूं
नका कुणी रं घुमूं ॥ ५ ॥

नसती पीडा आज घरीं आलीया आलीया हाः हाः......
जिद्द कशास मारतोस !
जबर काय रे तूं
हाः...हाः...हाः...हाः...हाः.. हा...है
हैय्यो...हिय्यो...हैय्यो...हिय्यो... ॥ ६ ॥

# २८. पाटलाचं लगीन

१. *वेशभूषा :*

पाटलाचं लगीन म्हटल्यावर कपडे कसे असावयास पाहिजेत, हें का सांगायला हवें! पुरुषांना जरीचे फेटे, उपरणीं, कपाळावर कुंकवाचा टिळा अन् त्यावर अक्षता. बायकांना नऊवारी लुगडीं, दागदागिने इत्यादि. नवरानवरींच्या कपाळांवर बाशिंगें बांधलेलीं. असा सारा लगीनथाट--

२. *वाद्यें :*

हलगी, ताशा, ढोल, झांजा इत्यादि.

३. *निवेदन :*

थांब व्हं थांबा! बाईच थांबा! काय, काय म्हंगालात, ' गरबड कसली ? ' आवं, पांढरवाडीच्या पाटलाचं लगीन हाय् नव्हं का! पाटील म्हंजी अक्षी गांवचा राजा! गांवचं मांग, रामोशी, व्हलार, तराळ अन् बारा बैतं जनुं त्येचं सरदार. तवा लगीन अन् त्ये बी पाटलाचं. मंग आम्हां बायाबापड्यांची कोन धांदल!... बया, बया ...
आवं ऽऽऽ कऱ्हाडची वऱ्हाड मंडळी गांवच्या येशीवर आलेत नव्हं का! पगताय् काय येड्यावाणी! आरं ऽऽऽ सांगा रं कुनी, फुका पिपानी. आलं, आलं वऱ्हाड. येशीवर थांबवा त्येंचं बिऱ्हाड ...

वाजवा हलगी, आली मुलगी सजून लग्नाला हो बाई सजून लग्नाला ॥ ध्रु ॥

लगीन मोरबा पाटलाचं
मांडव जोसांत थाटलाच
वऱ्हाड समदं लोटलंच
आलं वऱ्हाड, सोडून कऱ्हाड पांढरवाडीला रं पांढरवाडीला ॥ १ ॥

व्हलार, तराळ, गांववालं
माधवकाका बी बामन आलं
बाबुमियां त्यो ताशेवालं
बैलांची जोडी थांबवा थोडी गांवाच्या वेशीला रं गांवाच्या वेशीला ॥ २ ॥

ऐका...ऐका...देइल पैका,
रागाऊनशान जाऊं नका
तुमी बी सांगा माधवकाका
आला पाटील पैका वाटील समद्या गांवालाऽऽरं समद्या गांवालाऽऽ ॥ ३ ॥

नगं नगं करूं आतां खोटी
कुकु लावुनशान भरा ग ओटी
समद्यांच्या करवा भेटीगांठी
बांधून फेटा, हंसत भेटा एकामेकाला रं एकामेकाला ॥ ४ ॥

आमंदी जाऊनशान बसा बसा
गिरजीचं घर ध्ये जानोसा
हवं–नको त्यें पुसा पुसा
आणा ग कुणी, घड्यांत पानी पायांवर घालायला ग पायांवर घालायला ॥ ५ ॥

मंतर म्हनतुया बामन,
सावधान ! सावधान ! ! सावधान ! ! !
शुभ मंगल सावधान,
पाटलाचं लागलया लगीन
वाजवा टाळ्या, पडल्या माळा शुभ घडीला ग शुभ घडीला ॥ ६ ॥

गोरी नवरी चन्द्रावळी
नेसून आली साडी हिरवी
अंगांत घालून हिरवी चोळी
नाकांत नथ, सांगाती नाथ, गांठ पदराला ग गांठ पदराला ॥ ७ ॥

लक्ष्मी आलीया पिरतीची,
राखील निगा धरतीची
वरात काढूं या रातीची
फुका रं शिंगं, बांधा बाशिंगं नवरदेवाला रं नवरदेवाला ॥ ८ ॥

रामोशाची सजवा घोडी
नवराबायकोची बसवा जोडी
नाचते तालांत, चालली वरात, लेजिम चाले छान् झन् झन्
छम् छन् छन् छन् छन् छन् है ... है ...
मशाली घेऊनशान हातांत
चालूं म्होरं थाटांत
आनंद माईना पोटांत
आली मुलगी, झाली सलगी, आज ह्या लग्नाला रं आज ह्या लग्नाला ॥ ९ ॥

## २९. होळी नृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्री व पुरुष समसमान असावेत.

२. *वेशभूषा :*

नऊवारी कोणत्याही एकाच रंगाचीं पातळें. पुरुषांना गुडघ्यांपाशीं घट्ट बसतील अगर बांधतां येतील अशा सॅटीन विजारी. जरीचीं जाकिटें, जरीचे फेटे व जरीचीं उपरणीं इत्यादि.

३. *दागिने :*

हातांत, गळ्यांत व कानांत.

४. *इतर साहित्य :*

पुरुषांच्या हातांत तलवारी व त्यांच्या टोकांवर खोचलेलीं लिंबें.

५. *वाद्यें :*

टिमकी, ढोलकी, पिप्पाणी, झांज.

४. *निवेदन :*

हें नृत्य महाराष्ट्रांतील ' होळी सणा ' संबंधींचें आहे. ह्या सणाला भारतांत दक्षिणेकडे ' कामदहन ' व उत्तरेकडे ' ढोलायात्रा ' असें म्हणतात. आपल्या मातृभूमीच्या रक्षणार्थ जे योद्धे मरण

पावतात त्यांना 'वीर' अशी संज्ञा आहे. महाराष्ट्रांतील अशा शूर घराण्यांत जे जन्मलेले असतात ते फाल्गुन पौर्णिमेस होळीची पवित्र ज्योत पेटवून, तिची पूजा करून, होळीची पुरणपोळी खाऊन हर्षभरित होतात.

शब्दांची व कृतीची धुळवड दुसऱ्या दिवशीं सकाळीं झाली तरी, सायंकाळीं मात्र – रंगी-बेरंगी उंची पोशाख करून ते सगळे वीर नाचत नाचत आपल्या ग्रामदेवतेला वंदन करण्यासाठीं जातात.

ढोल-तुणतुण्याच्या तालांत, मंजिरीच्या मंजूळ बोलांत – " चल रे वीरा, नाच – नाच " असें म्हणू लागल्यावर, " नका ग थांबू, चिरा ग लिंबू " अशा त्यांच्या वीर ललना एकमेकींना बजावीत लिंबू ओवाळून टाकतात. मग बेभान झालेले वीर शांत होतात.

म्हळीला गवऱ्या पांच – पांच
म्हळीचा सण हाच हाच, चल रे वीरा, नाच – नाच ॥ ध्रु ॥
नाच बाई नाच – नाच बाई नाच
जमल्यात वीर बघ भवतीं पांच
हा बाई तुझा, हा बाई माझा – पती ग हाच
म्हळीला गवऱ्या पांच-पांच-चल रे वीरा, नाच-नाच ॥ १ ॥
आलं का रं राया अंगांत ?
वीरश्रीच्या रंगांत
अशी कशी तुझी रं संगत !
घालं नका पिंगा – समद्यांना सांगा
म्हय्-म्हय्-म्हय्-म्हय्-म्हय्-
म्हळीला गवऱ्या पांच-पांच-चल रे वीरा, नाच-नाच ॥ २ ॥

नाचत चालले समदे वीर – समदे वीर
बेभान झाल्याती सुटला धीर – सुटला धीर
जाऊं नको म्होरं, मागं फीर – मागं फीर
लिंबाचा पाला – डोईवर घाला
इरश्रीची तेस्नी आंच – चल रे वीरा, नाच – नाच ॥ ३ ॥

रातीला जाऊनश्यान केली चोरी – केली चोरी
दारोदारुन आणली हो गवरी – आणली हो गवरी
वंगाळ बोलून कावले भारी – कावले भारी
टिम् – टिम् – टिम् – टिम् – टिम्
टिमकी जोरांत – वरडूं नका बाई हतं दारांत
व्हळीला गवऱ्या पांच – पांच, चल ग पोरी, नाच – नाच ॥ ३ ॥

अल्याड गंगा, पल्याड गंगा – मधीं व्हता तवा
इर गेले लढाया, येतील बाई कवा ?
कवा बाई कवा, कवा बाई कवा
माझा बाई इर तरी यायला हवा
भटजीबुवा, या या – घडी नगं वाया
पूजा करा व्हळीची – पडतो आमी पाया
वाजून टिमकी गाच – गाच – चल रे वीरा, नाच – नाच ॥ ५ ॥

गेल्या ग ज्वाला गगनांत
आला ग वीर माझ्या सदनांत
फुललाय् आनंद वदनांत
घाला आता फेरी – कुनाची चोरी
या ग पावलीं ह्याच, ह्याच – चल रे वीरा, नाच – नाच ॥ ६ ॥

डोईवरती आना हंडा – हंडा पानी,
नदीवरनं आना, हिरीवरनं कोनी
व्हळीमंदी टेऊनश्यान – म्हनूं या गानीं
झाली बाई धुळवड – पुरे ती बडबड
" व्हळीला गवऱ्या पांच – पांच "

म्हळीला गवऱ्या पांच – पांच – चल रे वीरा, नाच – नाच
चल रे वीरा, नाच – नाच – चल रे वीरा, नाच – नाच ॥ ७ ॥

म्हळीची खाल्लीया पुरनपोळी–पुरनपोळी
धुळवड झालीया आज सकाळीं–आज सकाळीं
वीर नाचती या ग येळीं–या ग येळीं
नका ग थांबू – चिरा ग लिंबू

या ग पावलीं ह्याच – ह्याच – चल रे वीरा, नाच – नाच
चल रे वीरा, नाच – नाच – चल रे वीरा, नाच – नाच ॥ ८ ॥

# ३०. महालक्ष्मी नृत्य

१. *नृत्यसजावट :*

हें नृत्य करणाऱ्या सर्व बायका असाव्यात.

२. *वेशभूषा :*

हिरवीं आणि तांबडीं नऊवारी जरीचीं लुगडीं. हिरव्या लुगड्यावर तांबड्या व तांबड्या लुगड्यावर हिरव्या चोळ्या असाव्यात.

३. *दागिने :*

कमरपट्टा, हातांत गोटपाटल्या, गळ्यांतील दाग-दागिने, नाकांत नथ व कानावर केपा इत्यादि.

४. *केशभूषा :*

जुन्या संस्कृतीची आठवण व नृत्याला उठाव येण्याच्या दृष्टीनें केसांचा खोपा घालून, त्यांत मूद अगर फुलें इत्यादि.

५. *साहित्य :*

हातांत लहानश्या घागरी अगर मातीचे रंगविलेले घट.

६. *वाद्यें :*

तबला, मृदुंग, पखवाज, थाळी इत्यादि.

७. *इतर सूचना :*

नृत्याला सुरुवात करण्यापूर्वी धूप घातल्यास पवित्र वातावरण निर्माण होईल. निवेदन वाचतांना वाद्यें हळूं हळूं वाजत ठेवावींत व निवेदन संपत आल्यावर जरा मोठ्यानें सुरूं करावींत.

८. *निवेदन :*

नवरात्रांत देवीचा उत्सव सर्वत्र होत असतो. प्रत्येक ठिकाणच्या चालीरीतीप्रमाणें तो साजरा केला जातो. कुलाचारही अनेक आहेत आणि त्याप्रमाणें मोठ्या थाटामाटानें पूजा चाललेली असते.

बंगालमध्यें तर घरोघर नृत्य, संगीत, पूजा व किर्तनें होत असतात. महाराष्ट्रांतील अशाच एका प्रथेवरील हें नृत्य आहे.

नवरात्रांतील ती अष्टमीची रात्र. त्या रात्रीं कांहीं स्त्रियांच्या अंगांत देवी महालक्ष्मी प्रवेश करते व ती घागरी फुंकीत नाचूं लागते.

घंटा-नौबतीच्या नादांत, मातेच्या मंदिरांत, धूपाच्या धुरांत, गाण्याच्या सुरांत, घागरी फुंकतां फुंकतां आठ दिवसांच्या पूजेची सांगता मोठ्या भक्तिभावानं करतां करतां – “आलं, हळद-कुंकू, भक्ता जिंकू” असें म्हणणाऱ्या साऱ्याजणी देवी मात्र मध्यान्ह रात्र उलटून जातांच, नवरात्राच्या शिगेला पोहोंचलेल्या जयघोषांत अंतर्धान पावतात.

हेंच, हेंच महालक्ष्मी नृत्य ! पहा, सांज झाली, लक्ष्मी आली ...

नवरात्र ...... नवरात्र ...... नवरात्र

साऱ्याजणी याऽगऽऽआज आतां मात्र

नवरात्र ...... नवरात्र ...... नवरात्र ॥ ध्रु ॥

कशी रंगांत – देवी अंगांत

देवी अंगांत – आली संगात

आली संगात – कशी रंगांत

हूं ... हूं ... हूं ... हूं ...

(घागरी फुंकत जलद बराच वेळ करणें)

भावभक्तीनें सुरु करूं सत्र

साऱ्याजणी या ग, आज आतां मात्र

नवरात्र ...... नवरात्र ...... नवरात्र ॥ १ ॥

देवीच्या ग दारीं, घ्या – घ्या – घागरी

घ्या – घ्या घागरी – फुंकूं या सारी

फुंकू या सारी – देवीच्या ग दारीं

हूं ... हूं ... हूं ... हूं ... ( घागरी फुंकीत जलद )

पुसाया आले माता – पिता – पुत्र

साऱ्याजणी या ग, आज आतां मात्र

नवरात्र ...... नवरात्र ...... नवरात्र ॥ २ ॥

आज अष्टमी – आले आतां मी

आले आतां मी – कांहीं नाहीं कमी

कांहीं नाहीं कमी – आज अष्टमी

हूं ... हूं ... हूं ... हूं ... ( घागरी फुंकीत जलद )

प्रश्न पुसा कोणी, शिथिल झालीं गात्रं

( ही ओळ म्हणत म्हणत झिम्मा खेळणें )

नवरात्र ...... नवरात्र ...... नवरात्र ॥ ३ ॥

आलं हळदकुंकू, भक्तांना जिंकू
भक्तांना जिंकूं – नका हळूं फुकूं
नका हळूं फुंकू – आलं हळदकुंकूं
उलटूनी गेली बाई मध्यान् रात्र
साऱ्याजणी या ग, आज आतां मात्र
नवरात्र …… नवरात्र …… नवरात्र ॥ ४ ॥

# ३१. गोंधळी नृत्य

१. *नृत्यसजावट :*

स्त्रिया व पुरुष समसमान असावेत. त्याशिवाय ह्या साऱ्यांच्या मध्यभागीं नाचणारा गोंधळी.

२. *वेशभूषा :*

बायकांना नऊवारी पातळें. पुरुषांना धोतर, अंगांत सदरा व त्यावर जाकीट, जरीचे फेटे व जरीचें उपरणें.

३. *दागिने :*

खेड्यांतील स्त्रियांना शोभून दिसतील असे असावेत.

४. *वाद्यें :*

संबळ, तुणतुणें, डिमडी व मंजिरी.

५. *निवेदन :*

लगीन झाल्यावर तुम्हांला खरा गोंधळ खेड्यांतूनच पगाया मिळेल.
संबळ–तुणतुण्याच्या नादांत अन् डिमडीच्या खणखणाटांत, जळत्या मशालीच्या उजेडांत गोंधळी गाऊन, नाचून पंढरीच्या विठोबाला, जेजुरीच्या खंडोबाला अन् इतर समद्या देवास्नी सांकडं घालतो. लग्नाला आलेल्या वऱ्हाड्यांसंगं समद्यांना जागवतो —

त्यो काळा काळा नवरा अन् ती नवरी बी काळी
असली तरी आज पगा राजा–राणीच्या
झोकांत समद्यांसंगं ह्या गोंधळांत भाग घ्याया
आल्याती —
हां – हां –तुमची गरबड-गोंधळ थांबवा वाईच !
अन् ह्यो पगा आमचा गोंधळ —

आला गोंधळी हो, नाचे गोंधळी
गानं ऐकाया जमली आळी – हो जमली आळी ॥ ध्रु ॥

थांबा – थांबा – थांबा – तुमी, थांबा अंमळ
वाजूं लागली हो कशी संबळ
टंगणिक् – टंगणिक् – टंगणिक् –
गाऊं लागला गानं बी येक
भंडार लावूनशान पगा कपाळीं ॥ १ ॥

तेल ओतूनशान पेटवा मशाल
परकाश पडला पिवळा नि लाल
ज्योत नाचते करुनी घाई
थुई - थुई - थुई - थुई - थुई - थुई
सावली बी नाचे संगं काळी ॥ २ ॥

कानावर पगा योक त्यो हात
करूं लागला हलुहलु साथ
तुण् – तुण् – तुण् वाजे तुणतुणं
वाजिवितो मंग हातीं घेऊन,
खुलली पगा समद्यांची कळी ॥ ३ ॥

नवरा – नवरीची आलीया जोडी
कोट – रुमाल त्येचा, हिरवी तिची साडी
काळा काळा नवरा, नवरी बी काळी ॥ ४ ॥

नवरा राजा, नवरी राणी
नवरीच्या आल्या कैक साजणी
समद्या संगं म्हनत्यात गाणीं
कसं वाजती पैंजण आणि –
छन् – छनान् छन् – छन् – छन्
त्येंना नाचूं दे, आतां त्येंची पाळी
नाचूं लागली समदी आळी – हो समदी आळी ॥ ५ ॥

आड्याल या वाईच कुंभार – राजं
गोंधळ घालुं या आपुन आज
पोगाट खाऊनश्यान येतो रं
विडीचा झुरका मारतो रं
जागायचं हाय मंग रातसार
सरमाडाच्या काड्या आना चार
देव खालीं ठेऊन
पूजा नाचूं करुन
गोडं तेल घालून
टेंबा द्या रं शिलगून
नवसाचा गोंधळ घालूं या
देवांनो, समदे या या
या – या – या – या – या वेळीं
गानं ऐकाया जमली आळी – जमली आळी ॥ ६ ॥

पंढरीचा इट्ठोबा –
जेजुरीचा खंडोबा –
कोल्हापूरची आई आंबा –
आळंदीचे ज्ञानोबा –
आबापुरीचे भैरोबा –
आले आले जोतीबा –
भंडाऱ्याची आण रं थाळी

रात सारी सरली
झुंजूमुंजू झाली
तांबडं पगा फुटलं
गांव सारं उठलं
चालला पगा गोंधळी – राम राम मंडळी
राम राम मंडळी – चालला पगा गोंधळी

## ३२. भिल्ल नृत्य

१. *नृत्यसजावट :*

ह्या नृत्यांत स्त्री व पुरुष समसमान पाहिजेत.

२. *कपडे :*

स्त्रियांनीं गुडघ्यांवर लुगडीं नेसावींत. पुरुषांनीं गुडघ्यांवर धोतरें नेसावींत, डोक्यावर तांबडें मुंडासें बांधावें.

३. *दागिने :*

दोन पद्धतीनें दागिन्यांची सजावट करतां येईल. कथलाचे दागिने गळ्यांत, हातांत, कानांत भरपूर प्रमाणांत असल्यास उत्तम. नसल्यास मोठमोठ्या पानांचे, फुलांचे, रानवट फळांचे दागिने करूनही शोभा आणतां येईल. त्या-शवाय बायकांना केसांत पिसें व पुरुषांनीं मुंडाश्यांत पिसें खोवावींत.

४. *वाद्यें :*

चर्मवाद्यें – ढोल, नगारा, थाळी इत्यादि.

५. *सूचना :*

निवेदनापूर्वी ढोलाचा गंभीर आवाज चालू ठेवावा व निवेदन सुरू झाल्यावर आवाज बारीक, अस्पष्टसा चालू ठेवावा.

६. *निवेदन :*

ही भिल्लांची जमात–करते सदा मात–
कुणी न धरी हात
मंग रात असो वा दिस–भिती वाघ त्यास
डोळं नाय भिजलं–हृदय नाय थिजलं
सजलंय शरीर पानानं–कला दिलीय् देवानं
आनंदानं जगावं–खुश्याल गानं गावं
मंत्र त्येंचा हाच–रानांत करत्यात नाच
बाई...बाई...बाईऽऽऽ लाज मुळीं नाय
खुश्याल नाचत्यात थय्...थय्...थय्
आरं शाहन्या मानसा, पग रं पग
नाय ह्यो तमाशा, नाय हा वग
दिसेल त्येंतून तुला आमा भिल्लांचं जग....

भिल्लांच्या पोरी आमी, भिल्लांची पोर
घुमवितों पगा कडी–कपार
भिल्लांच्या पोरी आमी, भिल्लांचीं पोरं ॥ ध्रु ॥

भिल्लांची तर हो, ऐका कहाणी
आमी नाचतों गाऊन गाणीं
ऐका हो ऐका, ध्येन देऊनी
रानावनामंदीं आमचीं वो घरं–कसलीं घरं ! रान–शुट्यारं ॥ १ ॥

हिरवळ खालीं, भवतीं झाडी,
आभाळाची वर निळसर माडी
पोरं तर पगा समदीं उघडीं
आठ दिशांची हाय पाखर–हाय पाखर–कशी चौफेर ॥ २ ॥

पाना–फुलांनीं झाकुनी अंग
हिरवीगार रानं आमच्या संगं

सपनामंदीं होउनी दंग
नाचतो पगून विजेची कोर – विजेची कोर – हाये सुंदर ॥ ३ ॥

दाट अंधारी किर्र हो झाडी,
वाकड्या शिला, भयाण दरडी
नजर त्येंची सदाच करडी
भुजंग जणूं वन – निर्झर – वन – निर्झर – वाहे झरझर ॥ ४ ॥

सावजाची कंदी कुण् – कुण् – कुण्
फिरवूं भिरारा झाडून गोफण
कोल्हा, तरस येतां सिंहीण
धरणीवर पाडूं – सोडुन तीर – सोडुन तीर – भेदूं या ऊर ॥ ५ ॥

एकलं हिंडतों धरून हिंमत,
घेऊनशान भाला सदा हातांत,
हांक देतो जोसांत – कंदी होतां घात
व्होवो मंग काई, नसे आमा घोर—नसे आमा घोर—असे आमी वीर ॥ ६ ॥

काळाचं मैदान जरी अफाट
जीवनाचा करतों नाच अटोकाट
आमी तुमी येक, हें समदं खोटं
पीळ अंगाचा, कसा ह्यो दोर – कसा ह्यो दोर – सदा त्येचा जोर ॥ ७ ॥

सह्याद्रीच्या ह्या कडेकपारीं
चाहुल लई, भयाची दरी
सोसाट वारा, मेघांच्या सारी
तरी नाचतो, जणूं पगा मोर – जणूं पगा मोर, लई गुलजार ॥ ८ ॥

गिरी – शिखरें, रान – भुयारें
ढांसळत्याती पाऊसवारे
मेघ गर्जती जणूं नगारे – धुम् – धुम् – धुम् वाजती सारे
रौद्र तांडव चाले भेसूर – चाले भेसूर – नसे कसूर ॥ ९ ॥

कंदी तांडव, कंदी ऱ्हो लास्य
तोडून वाईच समद्यांचं दास्य
नाय पगा दुःख, तोंडावर हास्य
नायी घेनार कंदी माघार–कंदी माघार–जातों आमी पर समदं ऱ्होरं ऱ्होरं
भिल्लांच्या पोरी आमी, भिल्लांचीं पोरं ॥ १० ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम....३६०६० वि: ......
क्रमांक ........ नों. दि. २।३।६४

१३४५४

REFBK-0013474
REFBK-0013474

वार्षिक संमेलनांत
किंवा लोकनृत्यांच्या स्पर्धेत
भाग घेतांना
शाळांना नृत्यगीतांची
जी गरज पडते
ती भागविण्यासाठीं

# ग्रामीण नृत्यगीतें

श्री. गो. नी. दांडेकर, श्री. ग. ल. ठोकळ
श्री यशवंत गुप्ते, श्री. कृष्णदेव मुळगुंद यांनीं लिहिलेलीं.

संपादक
कृष्णदेव मुळगुंद

किंमत दोन रुपये

श्री लेखन वाचन भांडार, ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणें

छपाई व्ही राजेन्द्र आर्ट प्रेस पुणें २.